


# कामधेनु विद्यालय

प. धृ. स. हॉ. वाचनालय ...
क. ६९९१ नों. दि. ........
ता. १०. ........

लेखक
विष्णु वासुदेव जोशी

बाल वाङ्मय
८८५
१०।२।५६
२८४९५
IRBK-0106991

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव, मुंबई

किंमत ६० नये पैसे

© केशव भिकाजी ढवळे, १९५८

पहिली आवृत्ति : डिसेंबर १९५८

मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
बा. ग. ढवळे
केशव भिकाजी ढवळे
चिराबाजार, मुंबई २


सजावट :
द. ग. गोडसे

८।२ ६६९१

आज
जोशीबुवा
त्यांच्या
‘ विद्यालयाचें ’
हें
स्वरूप
पाहायला
हजर
असते
तर
त्यांना
किती
आनंद
झाला
असता
म्हणून
सांगूं !
पण ....

— प्रकाशक

IRBK-0106991
IRBK-0106991



वाचनालय
अनुक्रम २२२१५
विभाग
क्रमांक ८८६
नों. दि.
७-२-५६

# १.

"अरे अनुशासना, छात्रांना म्हणावं, आतां फार वेळ पाण्यांत डुंबत बसूं नका. पहाटेस पाण्यांत डुंबणं चांगलं नाहीं." कृषिकाचार्य गुरुजी ध्यान विसर्जन करून मुलांस म्हणाले.

मृगपाद नांवाचा चुणचुणीत मुलगा म्हणाला, "गुरुजी, बाहेरच्या थंडींत कुडकुडण्यापेक्षां गंगेच्या ऊबदार पाण्यांत डुंबणं आईच्या कुशींत निजल्यागत वाटतं. गंगा ही आमची माताच आहे असं कुलपति देखील म्हणतात. मी संध्या देखील पाण्यांत बसून करीत आहें."

"बरं, पण आतां गायी सोडायची नाहीं का वेळ झाली ? कुलपति कधींच यज्ञशाळेंत गेले. आज समिधाही आणायच्या आहेत .... हं. आपल्या साळीच्या शेतांतील ओंब्या वेंचायच्या असं आपण ठरवलं आहे. लवकर कामाला लागलं पाहिजे."

कृषिकाचार्य आपलें गवाळें गुंडाळीत म्हणाले.

"गुरुजी, काल अपुरं राहिलेलं, वायुविज्ञान आज पुरं करणार ना ? शरत्कालीन वारे हा आजचा पाठ आहे." अनुशासनानें आठवण दिली.

"हें दंव पाहा कसं छान पडलं आहे. त्याचीही माहिती देईन लोंबी वेंचतांना. वायुविज्ञानाचा हा भाग आहे." गुरुजी म्हणाले.

गोरक्ष मध्येंच म्हणाला, "मी आपल्या गायी घेऊन शेतावरच येऊं का ? मी तुमच्याच पाठाला बसेन."

"तुझ्या गायी शेताची नासाडी करतील." मृगपालानें म्हटलें.

"छे ! छे ! त्या तुझ्यासारख्या हावऱ्या नाहींत. मी चरणीस लावीन तिथेंच त्या चरत राहातील." गोरक्षानें उत्तर केलें.

"गुरुजी, मला हा हावरा कां हो म्हणतो ? मी शेतांत काम करून दमतों त्या दिवशीं मी दोन द्रोण दूध मागतों. आपणच नाहीं का म्हणत, छात्रांनीं खूप काम करावं नि खूप खावं. एवढं दूध करायचं तरी काय ? सात सहस्र दुभत्या गायी आहेत ना आपल्याजवळ ? अहिंसाव्रताचं पालन करून योग्य तेंच दूध आपण घेतों. गोवत्स, अग्नि, देव, गुरु, अतिथि ह्यांचा यथायोग्य भाग आपण देतोंच."

अनुशासनानें मध्येंच तोंड घातलें, "मग सर्वांनीं सारखं दूध घ्यावं."

मृगपाद म्हणाला, "वा: ! कृषिवर्ग आणि कारुवर्ग ह्यांतील छात्रांना शारीरिक श्रम जास्त करावे लागतात म्हणून त्यांना जास्त दूध पाहिजे."

"अरे ! आपल्या कामधेनु विद्यालयांत कशाला तोटा का आहे ? श्रम आणि पचनशक्ति ह्यांना अनुसरून आरोग्याचार्यांनीं ठरवून दिलेला आहार प्रत्येकानें करावा., आहार हा जिव्हालौल्य पुरविण्यासाठीं नसून शरीरबल आणि आत्म्याची सात्त्विकता वाढविण्यासाठीं घ्यायचा असतो."

कुलगुरु वसिष्ठांच्या 'कामधेनु विद्यालयां'तील छात्रगण प्रात:स्नानाकरितां नदीवर आले होते. नुकताच शरद् ऋतु लागला होता. नदीचें पाणी ऋषींच्या हृदयाप्रमाणें स्वच्छ झालें होतें. आश्रमीय छात्रांनीं तयार केलेलीं पिकें तयार झालीं होतीं. पहाटेची गोड थंडी पडल्यामुळें सृष्टीनें जणूं कांहीं धुक्याचें शुभ्र वस्त्र पांघरलें होतें. निर्मळ वातावरणांत वावरणाऱ्या छात्रांचा वर लिहिल्याप्रमाणें संवाद चालला होता. तो आणखीही लांबला असता, पण तांतडीचा निरोप घेऊन एक बटु कृषिकाचार्यांकडे आला.

मुलांस त्वरेनें आश्रमाकडे येण्यास सांगून ते लगबगीनें गेले. मुलें भराभर बाहेर निघालीं. संध्यावंदन करून तीं आश्रमांत आलीं.

कुलपति वसिष्ठ आन्हिक कर्मे आटोपून प्रार्थनेकरितां वेदिकेवर आले. भगवान् सूर्यनारायणाचे बालकिरण वसिष्ठांच्या प्रसन्न, शांत, सात्त्विक मुखमंडलावर पडल्यामुळें तें तेजोयुक्त मुख जास्तच वंदनीय दिसूं लागलें. इतर गुरुजन सन्निध उभे राहिले. कमलदलाच्या अनुक्रमानें छात्रगण उभा राहिला. वसिष्ठांच्या दिव्य वाङ्निस्यंदानें शांत वातावरणांत पावित्र्याच्या लहरी उठल्या.

प्रार्थना आटोपली. "आश्रमवासी बंधु आणि छात्रजन हो!" किंचित् गद्गद स्वरांत वसिष्ठ बोलूं लागले, "एका गंभीर प्रसंगाची कल्पना मी आपणांस आणून देणार आहें. ह्या प्रदेशाचे अधिपति राजाधिराज विश्वामित्र महाराज ह्या प्रदेशांत शिकार करण्याकरितां येणार आहेत. राजदूत काल सायंकाळीं आज्ञा घेऊन आला आहे. राजाज्ञा अशी आहे: 'आश्रमाच्या विस्तीर्ण तपारण्यांत मृग्य पशु विपुल असून ते पुष्कळसे निर्भय आणि माणसाळलेले आहेत. अशा श्वापदांची शिकार शिकाऊ तरुण राजकुमारांना आणि युवराजांना करणं सोपं जाऊन शिकारीचा त्यांचा अभ्यास वाढेल. तरी तुम्ही सर्व छात्र व गुरु आमची शिकार संपेपर्यंत तपारण्यांत प्रवेशूं नये. कुणाची हत्या झाल्यास त्याची जबाबदारी आमच्यावर नाहीं.' ह्या प्रसंगीं आपण कसं वागावं हा मोठा प्रश्न आहे. हीं निर्भय हरिणशावकं, तीं सहस्रावधि धेनुबालकं ह्या हत्याकांडापासून कशीं संरक्षावयाचीं? शिकारीच्या निमित्तानें हिंसेची लीला करावयास निघालेल्या शेकडों राजदूतापासून आणि राजप्रेषितांपासून सहस्रावधि निरागस जीव वांचविणं मोठं कठीण आहे." वसिष्ठांचें बोलणें समजूनच कीं काय, दोन हरिणबालकें वसिष्ठांच्या प्रार्थनावेदीवर चढून त्यांच्या पायाला अंगें घासूं लागलीं. वसिष्ठांच्या करुण दृष्टीशीं आपली दृष्टि



का. वि. ३

भिडवून तीं मूक भाषेंत सांगत होतीं, " तुमच्या पायाचा आश्रय असल्यावर आम्हांला काळाचंही भय नाहीं. "

किंचित् थांबून वसिष्ठ म्हणाले, " धेनुसेवकांनो, तुमच्या धेनु तपारण्यांत चारण्यास नेऊं नका. आश्रमाभोवतींच चरूं द्या. पण ह्या स्वैरविहारी हरिणांचं रक्षण कसं करणार ? "

" कुलपते, " हात जोडून नम्रपणें आचार्य धृष्टि म्हणाले, " आश्रमी तपोवनांत शिकारीला येण्याची महाराजांची प्रथा नाहीं. कामधेनु आश्रमाला हें तपोवन सत्तानिवृत्ति करून अर्पण करण्यांत आलं आहे. तस्मात् ह्या अनुचित आज्ञेबद्दल आपण महाराजांचा निषेध करून ह्या सत्तातिक्रमा-बद्दल योग्य तो प्रतिकारही केला पाहिजे. "

गुरु वेत्रपाणी म्हणाले, " पूज्य कुलपते, ह्या विद्यालयाला आर्थिक मदत करण्यासंबंधानें जेव्हां विश्वामित्र महाराजांकडे मी आपल्या आज्ञेवरून गेलों, तेव्हां प्रत्यक्ष आर्थिक देणगी देणं राजसत्तेस परवडणार नाहीं ; विद्यालयानें तपोवनांतील भूमीच्या उत्पन्नावर चरितार्थ चालवावा; राजसत्ता उत्पन्नावरील $\frac{1}{6}$ राजभाग घेणार नाहीं असं ठरलं आहे. तपोवन विद्यालयाच्या पूर्ण मालकीचं आहे. वैध नियमांनीं पाहातां राजाला ह्या भूमीवर कसलीही सत्ता नाहीं. "

" मला वाटतं, आपल्या तपोवनांत शिकारीला अनुज्ञा देणं पाप ठरेल. येथील पशुपक्षी अहिंसक वातावरणांत वाढले आहेत. त्यांचा मनुष्यांवरील अविश्वास पार उडाला आहे. निर्भयपणें हिंडणाऱ्या प्राण्यांची हिंसा करण्याला अनुज्ञा देणं, त्या हिंसकांचा प्रतिकार न करणं हें पाप – विश्वास-घाताचं पाप – ठरेल " सूत्रक मुनि म्हणाले.

किंचित् कंपित स्वरांत वसिष्ठ गंभीरपणें म्हणाले, " मी तुमचा आशय समजलों. आपण हें लक्षांत ठेवलं पाहिजे, कीं राजा सशस्त्र आहे आणि आपण आश्रमवासी ऋषि आणि छात्र अहिंसेच्या व्रतानें बद्ध आहों. आपण क्षात्रविद्या आणि धनुर्वेद ह्यांचं शिक्षण देत असलों, जरी येथील

छात्र राजसैन्याशीं सशस्त्र युद्ध करण्यास समर्थ असले, तरी त्या विद्येचा उपयोग ब्रह्मचारी क्षात्रांना करतां येणार नाहीं. फार तर शिकारीवर सोडलेले बाण आपल्या छातीवर झेलून आपण आत्मबलिदान करूं शकूं."

छात्रवर्गांत चुळबुळ सुरू झाली. नैष्ठिक ब्रह्मचर्याच्या दिव्य तेजानें रसरसलेले, तपोवनाच्या अभिजात वातावरणांत वाढलेले व तपोनिष्ठ ऋषींच्या शिक्षणानें सुसंस्कृत झालेले विद्यार्थी तत्त्वनिष्ठेसाठीं कराव्या लागणाऱ्या त्यागाला कसे बरें भितील ?

"पूज्य कुलपते!" गोरक्ष हात जोडून म्हणाला, "आमच्या कुलांतील ५०० छात्र आत्मबलिदान करून गायीवांसरांस शिकाऱ्यांपासून रक्षूं इच्छितों. गायींच्या कुरणांत आम्ही शिकाऱ्यांस प्रवेशच करूं देणार नाहीं. शिकारीच्या विलासासाठीं गायी उपाशी ठेवणं हा कुठला न्याय ?"

कृषिकाचार्य म्हणाले, "हे सैनिक आपल्या तपोवनांत शिरले, कीं पिकाची नासाडी होणार. शालिक्षेत्रं तर एक दोन दिवसांनीं कापणीस आलीं आहेत. त्यांत ह्यांनीं शिकारीचा धिंगाणा घातला तर भातं नासून जातील! आश्रमीयांचं अन्न नष्ट होऊन आपणांस उञ्छ-वृत्तीवर जगावं लागेल. इतक्या छात्रांचा निर्वाह त्यानं होणार नाहीं. राजा विद्यालयाचा परामर्ष घेत नाहींच; उलट पिकांचा विध्वंस करूं पाहील, तर तें कोण साहील ?"

"राजाचे सहस्रावधि सैनिक जेव्हां हा प्रदेश व्यापून टाकतील तेव्हां ह्या प्रदेशाचं आरोग्यही बिघडेल." बलवर्धन ऋषि आरोग्य, शिस्त व व्यायाम ह्या विषयांचे प्रमुख होते. त्यांनीं आपलें मत सांगितलें, "त्यांचीं व्यसनं नि राहाणी आपल्या ब्रह्मचाऱ्यांच्या दृष्टीस पडून आरोग्यास, नैतिक वागणुकीस मोठाच धक्का बसेल. तस्मात् मृगयेचं शिबिर आपल्या तपोभूमींत नसावं."

वृद्ध मैत्रेय मुनी म्हणाले, "कुलगुरो, ह्या सर्व आचार्यांची व छात्रांची विचारसरणी आपण ऐकलीच आहे. तेव्हां महाराज विश्वामित्र ह्यांस समक्ष भेटून, त्यांचं मन वळवून तपोभूमींत मृगयेचं शिबिर स्थापूं

नये, अन्यत्र जावं अशी विनंती करावी. सामोपचारानें हें ऐकलं तर ठीक ; नाहींतर पुढें काय धोरण ठरवायचं तें ठरवूं. ”

आधींच गंभीर झालेली वसिष्ठांची मुद्रा आणखी गंभीर झाली. सागराचें गांभीर्यहीं फिकें पडलें असतें त्यापुढें. ते म्हणाले, “ व्रती हा नेहमीं साम करण्यास तयार असतोच. आपण व्रती आहों. तेव्हां मैत्रेय मुनी म्हणतात तशी विनंती करण्यास माझी ना नाहीं. पाहावं राजाचा हृदयपालट होतो, का आपणांस अन्य मार्ग अनुसरावा लागतो. ”

सर्वत्र निःशब्द शांतता पसरली. इतक्यांत घोड्यांच्या टापा आणि रथाची गंभीर घरघर ऐकूं येऊं लागली. सर्वांचेंच लक्ष तिकडे वेधलें. कुलपतींनीं संकेतदर्शक खूण करतांच वेत्रपाणी गुरुजींनीं मुलांस आपापल्या वर्गांत जाण्याची आज्ञा केली. मुलांची जिज्ञासा चुळबुळ करूं लागली रथ पाहाण्यासाठीं. पण प्रार्थना संपतांच शिक्षणाचा प्रारंभ व्हावयाचा ही शिस्त अंगीं बाणल्यामुळें मुलें आज्ञेप्रमाणें वर्गांत प्रवेशलीं.

मुलांप्रमाणें वाचकांसही हा रथ कोणाचा आणि कशाकरितां आला ह्याची जिज्ञासा लागली असेल.

अनुक्रमांक २४४२५
विभाग
क्रमांक
नों. दि. ७-२-५९
वाचनालय

## . २ .

“ हिरण्मयी, अग हिरण्मयी, झाल्या का तुझ्या माळा पुऱ्या ? आज तुझीं बोटं फुलं गुंफण्यांत मंद कां झालीं ? का वेत्रपाणी गुरुजींनीं हातावर कांहीं प्रसाद दिला, कालच्या तुझ्या ....! ”

“ सरमे, किती चहाटाळपणा करावा एकसारखा ! मला काय म्हणून वेत्रपाणी प्रसाद देतील ? आणि आपल्या आश्रमांत अशी शारीरिक शिक्षा देतात वाटतं ? हें तुम्हां नागरिक लोकांचं सैनिक-विद्यालय नाहीं ! ”

“ बरोबर. इथं तुम्हीं अपराध करावे नि त्याची शिक्षा भोगावी गुरुजींनीं. काल तुम्हीं वाजश्रय ऋषींच्या पाठाला गोंगाट केलात नि ऋषींनीं रात्रभर गंगेच्या पाण्यांत उभे राहून त्याचं प्रायश्चित्त घेतलं. ”

“ अगबाई, खरं कीं काय ? सरमे, माझा मुळीं अपराध नव्हता. मुलं म्हणालीं, ‘ उद्यांच्या कामधेनु महोत्सवाच्या मिरवणुकींत धेनूंच्या अग्रभागीं आम्ही चालणार. ’ तेव्हां मुलींच्या वतीनें मीं म्हटलं, ‘ तुमच्याही अग्रभागीं आम्ही आपलं पथक ठेवूं. ’ ह्यावरनं झालं सगळं. त्यावरनं गुरुजी खरंच का ग रात्रभर गंगेंत होते ? सरमे .... ! ”

“ अग, रडायला काय झालं ? मीं तुझी थट्टा केली. रात्रीं आम्ही नक्षत्रविज्ञानाच्या पाठाला गंगेवर गेलों, तेव्हां वाजश्रव ऋषि नदींत होते.



पण पुढें अपराधी मुलांमुलींनीं विनंती केल्यावरून ते परत आश्रमांत आले. तूं कांहीं अपराधी नाहींस. चल, पूस डोळे. मध्यें हें मोठं कमळ घालीनास? आम्हां आश्रमीय मुलींत तूं जशी शोभतेस तसं हें कमळ ह्या माळेंत शोभेल, नाहीं हिरण्मयी?"

"नुसती बोलूं नकोस. फुलं गुंफायचीं असलीं तर गुंफ, नाहींतर श्रीकन्या, ममता नि तारांकिता ह्यांना पाठवून दे. चल, मिरवणुकीची वेळ झाली."

हिरण्मयी इतकें बोलायला व गोरक्ष यायला एकच गांठ पडली. "काय रे गोरक्षा, झाली का उत्सवाची तयारी? प्रार्थनावेदीशीं कामधेनु आली का?"

गोरक्ष कांहीं बोलत नाहीं.

"सरमे, एका माणसाला कीं नाहीं, नाट्य फार चांगलं साधतं बरं का? आपल्यापुढें हा दुःखी नि विषण्ण चेहेऱ्याचा नट उभा आहे. ओळखलं बरं. सरमे, तूं एकदा हास पाहूं. म्हणजे पाहूं बरं एक माणूस हसतं....!"

"हिरण्मयी! सरमाताई! मीं गंमत म्हणून अशी मुद्रा केली नसून प्रार्थना आटोपल्यापासून माझ्या मनाला एका गोष्टीची हुरहूर लागली आहे. तुम्हांला माहीत नसेल. सम्राट् विश्वामित्रमहाराजांकडून एक दूत आतांच आश्रमांत आला आहे. आश्रमावर कांहीं तरी संकट येणार खास.

"आजचा उत्सव तरी पार पडेल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. कृषिकाचार्य अद्याप होमशाळेंतून आलेच नाहींत. कुलपतींच्या कुटिरांत कांहीं गंभीर चर्चा चालू असावी. बाकीचे वर्ग आपापले पाठ घेत आहेत."

"मग खरं सांगूं का गोरक्षा," हिरण्मयी म्हणाली, "मलाही आज कसली गूढ दुःखसंवेदना होत आहे. उत्सवाचा दिवस यायचा यायचा म्हणून आपण किती आनंदांत होतों, नाहीं? बघ, माळा देखील भरभर होत नाहींत."

" गोकुळांतील सारे छात्र, गायी, गोऱ्हे ह्यांना स्वच्छ करून त्यांच्या गळ्यांत माळा वगैरे घालून आज्ञेची प्रतीक्षा करीत आहेत. मजकडे कामधेनूच्या शृंगाराचं काम आहे; पण मला उत्साहच वाटत नाहीं. मला बहुधा बोलावणं आलं. "

" सरमे, तूं माळा घेऊन ये. हिरण्मयी, तूं पूजेची तयारी घेऊन प्रार्थनावेदीशीं ये. संकटाच्या कल्पनेनें निरुत्साही बनणं हें देखील दुबळेपणाचं आहे. संकटांत देखील उत्साह टिकवितो तोच संकटाला पुरून उरतो. हा पाहा मृगपाद म्हणजे साक्षात् उत्साह अवतरला., काय रे, मला गुरुजींनीं बोलावलं आहे ना? अरे अनुशासन, वृष्णि, धन्वा, ताई....अरे, हीं कुठें आहेत? " गोरक्ष अधीरतेनें म्हणाला.

मृगपादाची मुद्रा खिन्न पाहून हिरण्मयी हात थांबवून त्याच्या बोलण्याकडे आतुरतेनें लक्ष देऊं लागली.

" गोरक्षा!.... काय सांगूं? "

सरमा लटक्या रागानें म्हणाली, " कांऽहीं सांगूं नकोस. तुझ्या कडुलिंब खाल्लेल्या तोंडांतून कांहीं ऐकण्याची आजच्या उत्सवप्रसंगीं आम्हांस मुळींच इच्छा नाहीं. "

" कृषिकाचार्यांनीं मला बोलावणं कां धाडलं आहे? " गोरक्षानें विचारलें.

" आजचा महोत्सव बहुधा स्थगित ठेवला जाणार असं दिसतं, हिरण्मयी. " मृगपाद गंभीरपणें म्हणाला.

" कां? " सर्वांनींच एकदम विचारलें.

" सम्राटाकडून दूत आला आहे ना? त्यानें तपोवनाबाहेर येण्यास आश्रमीयांस बंदी केली आहे. "

" हं. बरोबर! आपली कामधेनूची मिरवणूक जायची तपोवनाबाहेर कल्पवृक्षकुंजांत. तिथेंच सायंकाळपर्यंत थांबून वनमहोत्सव चालायचा. " गोरक्ष म्हणाला.

" राजाज्ञेनें आमच्या उत्सवावर काय म्हणून नियंत्रण घालावं ? " सरमा म्हणाली.

" ....ही पाहा सारी छात्रमंडळी इकडेच आली. " गोरक्षानें छात्रांना खूण करून बोलावलें.

कामधेनु महोत्सवावर विरजण पडल्यामुळें दु:खी आणि उदासीन बनलेल्या छात्रमंडळींच्या सुखदु:खाच्या गोष्टी ऐकण्यापेक्षां जास्त गंभीर स्वरूपाची घटना कुलपतींच्या आश्रमांत चालू आहे. तिकडेच आपण लक्ष पुरवूं.

प्रार्थना आटोपतांच वसिष्ठ राजप्रेषित दूताला भेटण्यासाठीं कुटिरांत गेले. सम्राट् विश्वामित्र महाराजांचा निरोप आधींच पोचला होता. त्यावर आश्रमाकडून अनुमति मिळायच्या आंतच दुसरा प्रेषित आला. तेव्हां कांहीं निकडीचें वर्तमान असलें पाहिजे असा सर्वांचा ग्रह झाला होता.

प्रेषित हात जोडून वसिष्ठास म्हणाला, " कुलपते, कांहीं राजकीय कारणानिमित्त राजघराण्यांतील कुमार ससैन्य शिकारीकरतां उद्यांच ह्या तपोवनाकडे येणार आहेत. तेव्हां राजाज्ञेप्रमाणें मी आजच्या आज तपोवनाभोवतीं नाकेबंदी करून शिबिरस्थापना करणार आहें. तेव्हां आश्रमीयांनीं तपोवनाच्या मर्यादेबाहेर येणं हें राजाज्ञेच्या विरुद्ध आहे. कुलपते, आपले छात्र राजाज्ञेचं उल्लंघन करणार नाहींत अशी खबरदारी आपण घ्याल ना ? "

" मी ही राजाज्ञा ऐकून स्तंभित झालों आहें. नागरी उलाढाली नि राजकीय तंटेबखेडे ह्यांपासून अत्यंत दूर अशा तपोवनांत काळ कंठणाऱ्या आश्रमीय जीवनाची ही अशी गळचेपी करण्याची वेळ दुर्दैवानें सम्राटावर कां यावी ? "

" तें राजकारण मी सांगूं शकत नाहीं ह्याबद्दल मला खेद वाटतो. आपण मला आज्ञा देत असाल तर मी आपल्या कार्याला लागतों. " प्रेषित म्हणाला.

“ सम्राट् विश्वामित्र स्वतः येणार आहे ? ”

“ तेंही राजगुह्य मला अगम्य आहे. ”

“ हें शिबिर किती दिवस राहणार इथं ? ”

“ हा सम्राटांच्या इच्छेचा प्रश्न आहे. ”

“ ह्याचा अर्थ आश्रमाची टेहेळणी करण्याची ही नवी प्रथा सम्राट् पाडीत आहेत, असा मी करूं का ? ”

“ मला ह्याचं उत्तर देतां येत नाहीं. ”

“ आश्रमाचं म्हणणं सम्राटापुढें मांडण्याची सवड असेल तर तें मांडावं अशी माझी इच्छा आहे. कांहीं गैरसमज झाला असल्यास दूर होण्याचा तो मार्ग आहे. ” वसिष्ठांच्या ह्या बोलण्यावर प्रेषित इतकेंच बोलला, कीं “ आश्रमाचं म्हणणं त्वरित सम्राटांच्या पुढें मांडणं सोयीस्कर होईल .... पण हा कुलगुरूंचा इच्छेचा प्रश्न आहे. बरं, मी आज्ञा घेतों. ”

प्रेषित गेल्यावर वसिष्ठांनीं इतर ऋषिमुनींना बोलावून ही निकडीची राजाज्ञा त्यांना सांगितली. कामधेनु-महोत्सवाच्या मिरवणुकीचा प्रश्न चर्चेस निघाला. राजाज्ञेचा उद्दामपणा ऐकून ते जितक्रोध ऋषि म्हणूनच शांतपणें चर्चा करूं शकले. शेवटीं वसिष्ठ म्हणाले, “ आश्रमीय व्रतींनीं अहिंसेचं योग्य पालन करायचं आहे. प्रेषिताकडून कदाचित् अपमानास्पद उत्तरं दिलीं गेलीं नसतील कशावरून ? तस्मात् प्रत्यक्ष सम्राटाची भेट घेऊन निर्भयपणें आपलं म्हणणं मांडलं पाहिजे. मैत्रेय, आपण त्वरित सम्राटांची भेट घेऊन येऊं शकाल ना ? ”

“ बरं, पण आजच्या उत्सवाचं काय करायचं ? मुलं अगदीं उत्सुक झालीं आहेत. हा उत्सव म्हणजे नागरिक उत्सवाप्रमाणें चैन-विलासांचा खेळ नसून आपल्या आश्रमीय संस्कृतीचा निदर्शक आहे. मला वाटतं, आजचा आपला कार्यक्रम बदलणं इष्ट नाहींच ; पण धर्म्यही नाहीं. ” कृषिकाचार्य म्हणाले.

" शक्य, इष्ट आणि धर्म्य .... माझ्या मनाची शांति ढळूं पाहात आहे. तुम्ही आपापल्या पाठांना जा. छात्रांची तयारी किती आहे ह्याचा अंदाज काढा. तोंवर मी विचार स्थिर करून पाहातों. "

कुलगुरूंच्या आज्ञेप्रमाणें मैत्रेय ऋषि सम्राट् विश्वामित्र ह्यांची भेट घेण्यास गेले. इतर आचार्य आपापल्या वर्गांत पाठ घेण्यास गेले.

क्षात्रधर्माचा नि कर्माचा निःसीम उपासक सम्राट् विश्वामित्र भरतखंडावर राज्य करीत होता. भारताच्या आसमंतात् असणाऱ्या अनार्यादि लुटारू लोकांपासून प्रजेचें रक्षण करून त्यांच्यावर चांगली दहशत बसावी म्हणून सारा देशच्या देश क्षात्र वृत्तीचा बनवून क्षात्र धर्माची त्यानें उत्तम जोपासना केली. सारे पुरुष शस्त्रसंबद्ध (लढाऊ पेशाचे) बनल्यामुळें भारताकडे वांकड्या नजरेनें पाहाण्याची कोणाची हिंमत नव्हती. उलट सम्राटाच्या क्रुद्ध दृष्टिक्षेपाला आपण कधीं बळी पडूं ह्याची धास्ती इतर राजांना सदैव चळचळां कापवीत असे. ह्याचा परिणाम असा झाला, कीं प्रजेंत राजस आणि तामस वृत्ति वाढत चालली. देशांत शेती व इतर अर्थोत्पादन करण्याचें काम स्त्रिया व वृद्ध ह्यांच्यावर पडलें. नेहमींचें सज्ज – खडें – सैन्य, त्यांच्या स्वाऱ्या ह्याचा खर्च परस्पर भागला तरी पोटाला अन्न व वस्त्र ह्यांची वाण भासूं लागली. राजसत्ता फक्त सैन्य, हत्यारें, सैनिक-शिक्षण, स्वाऱ्या व बंदोबस्त ह्यांकडे लक्ष पुरवी. ह्याचा परिणाम ग्रामजीवनावर अनिष्ट होऊं लागला. सात्त्विक वृत्ति लोपत चालली. मानवी जीवनाचा आध्यात्मिक दृष्ट्या विचार करणारे त्यागी, निर्भय व निर्वैर वृत्तीचे ऋषिजन ह्या संक्रमणाकडे पाहून भारताच्या भवितव्याविषयीं साशंक होऊं लागले. सम्राटाचे कुलगुरु वसिष्ठ, आपल्या असाधारण पावित्र्यानें, धीरोदात्त वर्तनानें व आत्मबलाच्या प्रतिष्ठेनें अखिल भारताच्या आत्यंतिक निष्ठेचें स्थान होऊन राहिले होते. सम्राटाच्या ह्या क्रांतिचक्राला त्यांनीं पहिला विरोध केला. तेव्हां विश्वामित्र आपण काय

काय करतों आहोंत ह्याचा विचार करण्याइतका तरी भानावर आला. विश्वामित्रास वसिष्ठांनीं सगितलें :

" उपऱ्या आणि भटक्या अशा जमातीशीं वारंवार युद्ध केल्यामुळें सैनिकांतही हे दुर्गुण शिरले आहेत. भारताच्या बहुजनसमाजाला भूमाताच अन्न देत आहे; म्हणून बहुजनसमाजानें पुन्हा भूमातेच्याच सेवेला लागलं पाहिजे. जबाबदार असा कृषिवल समाज व लहान लहान नगरांत स्थायिक होऊन राहिलेले नागरिक ह्यांच्या जीवनांत नीति, ध्येयवादित्व व गोडी उत्पन्न करावयाची असेल तर ह्या भटक्या लुटारू जीवनापासून बहुजनसमाजाची मुक्तता केली पाहिजे. ("यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूत विजानतः ।")

राजस वृत्तींतून निघालेल्या भौतिक सुखलालसेला किंवा क्षात्र वृत्तीच्या दुराराध्य महत्त्वाकांक्षेला हा उपदेश कोठला पटायला ? सम्राटानें वसिष्ठावर भीरुतेचा उघड आरोप केला. तेव्हां वसिष्ठ अधिक वाद न करतां तपोवनांत निघून गेले. तेथें त्यांनीं आश्रम काढून आश्रमीय जीवनास प्रारंभ केला. भौतिक जगांतून निर्वासित होणें हें आध्यात्मिकतेचें लक्षण नसून सर्वभूतहित साधण्यासाठीं कार्यरत होणें हें खरें आध्यात्मिक जीवन. तेंच वसिष्ठांनीं केलें. आश्रमांत छात्र जमवून त्यांस भारतीय जीवनास उपयुक्त असें शिक्षण देण्याचा क्रम आरंभिला. खरें शिक्षण तेंच, कीं जें कामधेनुप्रमाणें जीवनाच्या साऱ्या गरजा भागवूं शकतें. वसिष्ठ आपल्या आश्रमांत हेंच जीवनाशीं समन्वय जोडणारें शिक्षण देत, म्हणूनच त्यांच्या विद्यालयाचें 'कामधेनु विद्यालय' हें नांव अन्वर्थक ठरलें.

सामान्य जनता मुकी असते. तिला आपलीं दुःखें नेमकीं बोलून दाखवितां येत नाहींत. वैयक्तिक सुखदुःखांचा निवाडा न झाल्यास जो तो आपापल्या ठिकाणीं असंतुष्ट असतो. वैयक्तिक असंतुष्टतेंतून सामाजिक विघटना जन्म घेते. दुःखाच्या कारणाचा अचुक शोध न लागल्यानें दोषांचें खापर एकमेकांच्या डोक्यावर

फोडण्यांत येतें. ह्यांतूनच हिंसात्मक क्रांतीचा उदय होतो. एखादा जडवादी हिंसक त्या क्रांतीचा पुढारी होतो. ही सर्व अनर्थपरंपरा टळावी म्हणून वसिष्ठांनीं कामधेनु विश्वविद्यालयाच्या रूपानें भारताची सेवा करावयाचें ठरविलें. वांसराला आपल्या मातेची साद ओळखते त्याप्रमाणें जनतेला वसिष्ठांची साद नेमकी ऐकूं आली. आपल्या दुःखाचा परिहार कशानें होईल हें जरी जनतेला कळत नसलें, तरी दुःख शमन झालेलें कळल्यावर त्या उपायांवर पूर्ण नैष्ठिक श्रद्धा ठेवण्यांत लौकिक जग कसूर करीत नाहीं. सर्व वर्णांचा व आश्रमांचा क्षात्रकर्मांत समावेश करण्याच्या सम्राटाच्या हुल्लडीमुळें त्रासलेले प्रजाजन कामधेनु विद्यालयाकडे आकर्षिले गेले. नागर व कृषिवल समाजांतील छात्रगण आश्रमाच्या आश्रयास आला ह्यांत नवल नाहीं; पण क्षात्र वृत्तीच्या लोकांचीं मुलेंही आश्रमांत शिक्षणास येऊं लागलीं. आश्रमांत इतर विद्यांबरोबर धनुर्वेदही शिकविला जाई. भावनाशून्य, अविवेकी, भाडोत्री धनुर्धरांपेक्षां आश्रमांत शिक्षण घेतलेले विवेकी, निर्भय व आत्मनिष्ठ धनुर्धर अधिक उपयुक्त ठरूं लागले.

सत्ताधीश सम्राट् नि आश्रमवासी विरक्त ह्यांच्यामधील लढ्याचें मूळ कारण हें असें आहे!


विचारांना विकृत वळण लागलें म्हणजे त्याच विचारांचा विकार होतो. सम्राटाचा दृष्टिकोन कामधेनु विद्यालयाबाबत असाच विकारवश – दूषित – झाला. सम्राटाकडून आश्रमवासीय कसल्याच साह्याची अपेक्षा करीत नसत. आधींच आश्रमीय जीवन अतिशय साधें नि भोगशून्य! जीवधारणेला आवश्यक अशा गरजा म्हणजे अन्न व वस्त्र. आश्रमाच्या भोवतालची तपोभूमि त्यांस अन्न व वस्त्र पुरवी. आश्रमांतील धेनु गुरु-शिष्यांवर नेहमीं प्रसन्न असत. समुद्रमंथनाच्या महान् रत्नांतून निघालेल्या चौदा रत्नांपैकीं कामधेनु आश्रमीयांतर्फे वसिष्ठांनीं स्वीकारली होती! कामधेनु आश्रमीयांचें जीवनसर्वस्व होतें. हजारों छात्रांचा प्रपंच ह्या कामधेनूच्या

प्रसादानें निर्वेधपणें पार पडत होता. अधिराज विश्वामित्र ह्यांस आश्रमाचा हा स्वावलंबी स्वतंत्र बाणा खुपत होता. म्हणून त्यांच्यावर कांहीं कड्याळ आणण्यासाठीं विश्वामित्रानें तपोभूमीकडे शिकारीस जाण्याचा बेत ठरविला ! ह्या शिकारीच्या कार्यक्रमास आश्रमासन्निध असलेलें अरण्य निवडण्यांत सम्राटाचा दुसराही एक राजकीय हेतु होता ! आपल्या क्षात्रबलाच्या प्रभावानें आश्रमीय ऋषींस भिववून त्यांजपासून करभाराच्या रूपानें आश्रमांत संचित असलेलें अन्न-वस्त्र घ्यावें. आश्रमाची वागणूक अनत्याचारी असल्यामुळें त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची आगळीक होणें शक्य नव्हतें. तेव्हां शिकारीच्या रूपानें आश्रमाच्या आसपास आपले आडदांड सैनिक पसरून ठेविले, कीं आगळीक उत्पन्न व्हायला उशीर कसला ?

हेंच पाहा, राज-प्रेषित आणि आश्रमीय छात्र ह्यांच्यामध्यें कांहीं बखेडा पडून मैत्रेय ऋषि सम्राटाकडून संधि-साधन करून परत यायच्या आंतच काय झालें तें पाहा ! बाल-सुलभ खोडकर वृत्तीचीं मुलें नि उद्दाम वृत्तीचा राजप्रेषित ह्यांच्यामध्यें कशावरून बरं बखेडा माजला ?

# . ३ .

कपिशाखेकडील एक छात्र उंच काठीवर शेतांत उभें करायचें एक बुजगावणें घेऊन शेताकडे चालला होता. आणखी बरोबर होते कांहीं छात्र. सम्राटाकडून आलेल्या रथाजवळूनच त्यांचा मार्ग होता. छात्र रथ पाहात उभे होते. गंमत म्हणून त्यांनीं काठीवरील बुजगावणें नाचविलें, त्याबरोबर रथाचे घोडे बुजले व उधळूं लागले. सारथी आणि सैनिक छात्रांवर डाफरूं लागले. मुलेंच तीं, त्यांनीं आणखी गंमत केली. तंटा व्हायला काय उशीर? आरडाओरड सुरू होतांच आश्रमीय छात्र व सैनिक गोळा झाले. घोडे उधळून रथ मोडण्याच्या बेतांत आले. सैनिकांनीं मुलांना पिटाळून लावण्यासाठीं लाठीहल्ला करण्याचा विचार केला. अनुशासन, वृष्णि, धन्वा, गोरक्ष, इ. छात्र तेथें आले. एक सैनिक लाठी घेऊन मुलांवर धावला. अनुशासनानें 'हस्तबंध' नांवाचा बाण त्या सैनिकावर सोडून त्याचे उगारलेले हात वरच्यावर बांधून टाकले. दुसरा सैनिक धावला. त्याच्यावर वृष्णिधन्व्यानें चरणबंध नांवाचा बाण सोडला. बाण त्याच्या दोन पायांतून पलीकडे जाऊन जमिनींत मेखेप्रमाणें घुसला. बाणाच्या पिसाऱ्यास लावलेल्या रेशमी काढण्या सैनिकाच्या पायांत गुंतून तो धाडकन् पालथा पडला. छात्र हसले; इतकेंच नव्हे, तर सैनिकही हसूं लागले. सैनिकांची फजिती झाली. तेव्हां



त्यांचा शतनायक नांवाचा अधिकारी अद्वातद्वा ओरडून अभद्र बोलूं लागला. मृगपादानें एक कंदुक बाण अशा प्रकारें सोडला, कीं तो नेमका शतनायकाच्या जबड्यांत अडकला! तोंडच बंद झालें शतनायकाचें. छात्रांचें हें शरनैपुण्य व हस्तलाघव पाहून सैनिक थंडे पडले. हीं पोरें आहेत तरी कोण? सम्राटाच्या सैनिकांची अशी फजिती कोणींच केली नव्हती. सैनिक चिडले. त्यांनीं धनुष्याला प्रत्यंचा चढविली. तीक्ष्ण बाणांचा उपयोग छात्रांवर करून त्यांचा प्रतिकार करण्यास सिद्ध झाले. ही गडबड ऐकून कामधेनु-उत्सवासाठीं सज्ज झालेले कित्येक छात्र तेथें जमले. उभयपक्षीं युद्धच सुरू झालें. सैनिकांचे बाण छात्र आपल्या अर्धचंद्र शरानें नेमके वेधीत. एकही बाण छात्रांवर पडेना. सैनिक अधिकच चिडले. ते आतां खड्ग, गदा, पट्टीश, इत्यादि आयुधें घेऊन छात्रांवर हल्ला करण्याच्या तयारींत होते.

इतक्यांत सेनापति बलमित्र, प्रधान मंत्री विदग्धराज व सम्राट् विश्वामित्र महाराज आल्याची ललकारी त्यांनीं ऐकिली. लगेच सारे सैनिक सम्राटांच्या सन्मानासाठीं आपापल्या जागीं उभे राहिले. छात्रगणही पुढें काय गंमत होते हें पाहाण्याच्या जिज्ञासेनें तेथेंच उभे राहिले. पण खुद्द वेत्रपाणी गुरुजींना छात्रांच्या ह्या कटकटीचा सुगावा लागला, म्हणून ते समक्ष तेथें आले. त्यांनीं छात्रांना आश्रमांत जाण्यास सांगून कृषिशाखेच्या छात्रांना आपलें काम करण्यासाठीं शेताकडे रवाना केलें.

मैत्रेय गुरु सम्राटांकडे गेले होते. त्यांचे तेथें काय बोलणें झालें न कळे. पण आश्रमांत होणारा कामधेनु-महोत्सव पाहाण्यासाठीं खुद्द सम्राट्, युवराज व राजपुत्र आणि प्रमुख राजमंत्री उपस्थित झाले. कुलगुरु वसिष्ठ चिंतनांत मग्न होते. मैत्रेय गुरु त्यांना भेटले. सम्राटाचा मनोदय त्यांना कळविला गेला. आश्रमीय छात्रगण कामधेनु-उत्सवासाठीं उत्सुकला होता. कुलगुरूनीं आज्ञा केली, कीं नेहमींप्रमाणें उत्सव साजरा करायचा. छात्रवर्गांत आनंदीआनंद पसरला. उड्या मारून आणि एकमेकांस मिठ्या

देऊन तो आनंद ते व्यक्त करूं लागले. मृगपाद हरणासारख्या उड्या मारीत वृक्षाखालीं, कुटिरांमध्यें थबकून राहिलेल्या छात्रांना हें आनंदाचें वर्तमान सांगण्यासाठीं गेला. गोरक्ष व त्याचे छात्र-बंधु ह्यांजकडे कामधेनूला शृंगारण्याचें काम होतें. ते कामधेनूच्या कुटिराकडे गेले.

वेत्रपाणी गुरुजी आणि अनुशासन ह्यांनीं मिरवणुकीची तयारी चालविली.

आश्रमीय मुली पुढें काय होतें काय जाणें अशा विचारानें माला गुंफावयाचें काम रेंगाळत करीत होत्या. मृगपाद त्यांच्याकडे गेला.

ममता म्हणाली, ‘ तो पाहिलास का मृगपाद उड्या मारीत येत आहे. बहुधा उत्सवाला अनुमति मिळाली असावी. ” सरमा म्हणाली, “ तसं असेल, नाहींतर ‘ सूत्रधार ’ गुरुजींनीं पाठाला बोलावलं असेल. सूत कांता, सूत कांता, उदासीनतेच्या वेळीं सूत कांता हें त्यांचं सूत्रवाक्य सांगायला आला असेल. ”

“ हें पाहा, तर्क कशाला ? मृगपाद उड्या टाकीत आलाच आहे त्याला विचारूंच या. ” तारांकिता म्हणाली.

“ अग बायांनो ! इथें उभ्या राहून काय करतां ? ” दम लागल्यामुळें थांबून मृगपाद बोलला.

सरमा, “ मग काय सूत कांतूं ? ”

ममता मृगपादाच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाली, “ सरमे, हें काय ग तुझं असं बोलणं ! काय रे, काय सांगणार आहेस ? ”

“ आनंदाची बातमी. ” मृगपाद पुढें म्हणाला, “ काय देशील ? बोल ! ”

हिरण्मयी “ लवकर सांगितलीस तर ऐकून तरी घेऊं. उगीच विलंब लावलास तर पाठीवर बक्षीस मिळेल ” असें म्हणाली, तें ऐकून साऱ्याच जणी हसल्या !

ममता हळुवारपणें मृगपादाचें मुख कुरवाळीत म्हणाली, " तूं नकोरे ऐकूं तिचं. सांग ना आनंदाची बातमी. हे इतके रथ कुणाचे ? सम्राटाकडून काय उत्तर आलं ? आपल्या उत्सवाचं काय झालं ? "

" उत्सवाचं काय ? उत्सव करायचा, आज करायचा. नेहमींप्रमाणें साजरा करायचा. कुलगुरूनीं आज्ञा दिली. धेनु शृंगारण्याचं काम सुरू झालं. तुमच्या माळांकडूनच खोटी आहे. " मृगपाद म्हणाला.

तें ऐकून त्या आश्रमीय मुली हर्षानें नाचूं लागल्या. मृगपाद त्यांना थट्टेनें दटावून म्हणाला, " बायांनो, आधीं ते हार तयार करा नि मग नाचा. तुमच्या नाचण्यांत ते हार तुटतीलसुद्धा. "

मुलींचे पुष्पहार बहुतेक झालेच होते. ते घेऊन त्या गोरक्षाकडे गेल्या. कामधेनु, धेनुखिल्लार, वृषभखिल्लार आणि गोवत्स ह्यांना पुष्पमालांनीं सजविलें. प्रार्थनावेदीजवळ सर्व छात्रगण, गुरु आणि धेनुपरिवार जमला. वेत्रपाणी गुरु आणि त्यांचे छात्र ह्यांनीं मिरवणुकीची व्यवस्था केली. सर्वांच्या पुढें पुष्पालंकारानें सजविलेली कामधेनु, तिच्या मागें धेनुखिल्लार, त्याच्यामागें वृषभखिल्लार, त्यामागें गोजिरवाणीं गोवत्सें व आश्रमीय हरणें, त्यांच्यामागें आश्रमीय मुली, तपोवनांत उत्पन्न होणारीं फळें व फुलें ह्यांच्या परड्या घेऊन उभ्या राहिल्या. मग निरनिराळ्या शाखांचे आणि निरनिराळ्या श्रेणींचे छात्र आपापलीं बोधचिन्हें घेऊन उभे राहिले. एका सुंदर कमानीला निरनिराळ्या धान्याचे घोस व लोंब्या बांधून ती कमान कृषिशाखेच्या विद्यार्थ्यांनीं धरली होती. कारुशाखेच्या विद्यार्थ्यांनीं एका लाकडी मनोऱ्यांत कलाकुसरीचे उपयुक्त पदार्थ ठेवून तो मनोरा गाड्यावर घालून मिरवणुकीबरोबर चालविला होता.

सूत्र-वस्त्रशाखेच्या छात्रांनीं सूत्र-साधनें, वस्त्र-साधनें, सूत्राचे नमुने व वस्त्राचे नमुने बरोबर घेतले होते. औषधीय शाखा, वास्तुशाखा, इ. अनेक शाखांचे छात्र होते. सर्वांच्या मागें शस्त्रास्त्र-शाखेचे छात्र आपापल्या श्रेणीप्रमाणें शस्त्रसन्नद्ध होऊन चालत होते. त्यांच्या पाठीवर निरनिराळ्या

बाणांचे भाते, निरनिराळ्या गदा, खड्गें इत्यादि हत्यारें होतीं. त्यांच्यामागें आश्रमीय गुरुजन, सर्वांच्या मागें कुलगुरु वसिष्ठ शांत आणि प्रसन्न चित्तानें उभे होते.

वेदीवर उभें राहून वसिष्ठ प्रसन्न हास्य करीत म्हणाले, "प्रिय छात्र ! कामधेनु-महोत्सव ही वार्षिक महानंदाची पर्वणी. तुम्ही सारींजणं ह्या दिवसाची अगदीं उत्सुक उतावीळपणें वाट बघत असतां. तुमची उत्सुकता व आनंद पाहून माझंही हृदय हर्षानें भरून जातं. तुमचा आनंद तेंच माझं परम समाधन ! मोठा विकट प्रसंग आला होता आज सम्राटाच्या आज्ञेमुळें ! मैत्रेय गुरुजींच्या चातुर्यानें तो प्रसंग टळला. उत्सव निर्वेधपणें साजरा करायला मोकळीक आहे. आपली ही मिरवणूक सुधासागर तलावाच्या जवळील कल्पवृक्ष प्रांगणांत गेल्यावर तिथें जो कार्यक्रम व्हावयाचा आहे, त्या वेळीं सम्राट् आपल्या परिवारासह उपस्थित असणार आहेत. ह्या थोर प्रेक्षकांचे आपण आभारी असलं पाहिजे ! आश्रमांत मिळविलेल्या साऱ्या जीवनकलांची आज उत्तम कसोटी लागायची आहे. विश्वदेवाची प्रार्थना करून मिरवणुकीला प्रारंभ करूं या !!"

* * *

तपोवनाशेजारीं उभारलेल्या सम्राटाच्या शिबिरांत काय चाललें आहे तें पाहूं. कामधेनु-महोत्सवाचा कार्यक्रम पार पडून सम्राट् विश्वामित्र आपल्या परिवारासह शिबिरांत आला. आश्रमीय छात्रांनीं दाखविलेलें शस्त्र-शास्त्र, कलाचातुर्य पाहून राजपरिवार चकित झाला. त्यापेक्षांही धक्का देणारी घटना तेथें घडून आली. तिच्यामुळें सम्राटाचें अंत:करण क्रोधानें अस्वस्थ झालें होतें. ज्याचा शब्दच काय, पण थुंकीसुद्धा खालीं पडत नसे, अशा सम्राटाची आज्ञा मोडली गेली .... आणि तीसुद्धा कोणीं ! तर आश्रमांतील छोट्या बटूंनीं ! गुरुजींची त्याला अनुमति ! थोरांचा क्रोध वणव्यापेक्षां दाहक असतो. राजपरिवारांतील लोक भिऊन गेले होते.

सम्राट् विश्वामित्र शिबिरांत उच्चासनावर होता. राजपरिवार, मंत्रिमंडळ सभोवार आपापल्या स्थानीं होते. कोणीच बोलत नव्हतें. ती निस्तब्ध शांतताही सम्राटास असह्य झाली.

कल्पवृक्ष प्रांगणांत असा प्रकार घडला. आश्रमीय छात्रांनीं शस्त्रविद्येचें प्रात्यक्षिक करून दाखविलें. छात्रांचें अद्भुत हस्तलाघव व शस्त्रनैपुण्य पाहून सम्राट् परम संतुष्ट झाला. आपण कोणी श्रेष्ठ पुरुष आहोंत आणि आपणांस संतुष्ट करण्यासाठींच हे खेळ चालविले आहेत असा अहंकार सम्राटाच्या ठिकाणीं जागृत झाला. अहंकारी पुरुषाची देणगी ही त्याच्या अहंकाराचेंच प्रदर्शन असतें. आपल्या औदार्यानें दिपवून टाकून कलावंतांना विकत घेण्याचा अशा पुरुषांचा स्वभावच असतो. त्याप्रमाणें सम्राटानें शस्त्रविद्येंत विशेष नैपुण्य दाखविणाऱ्या दोघां छात्रांस उत्तेजनार्थ सुवर्णगदा व सुवर्णचाप पारितोषिक म्हणून दिल्याचें उद्घोषित केलें. तसेंच काल-शाखेच्या एका छात्रास एक हजार रौप्य मुद्रा देऊं करून राजवाड्यावरील स्थापत्य अधिपतीची जागा देऊं केली.

पण हीं पारितोषिकें व हें स्थान स्वीकारण्याचें छात्रांनीं नाकारलें; इतकेंच नव्हे, तर "विद्येचं प्रदर्शन करून बक्षीस मिळवणं किंवा सहकारी छात्रांशीं स्पर्धा करून बक्षीस पटकावणं हे प्रकार कामधेनु-विद्यालयांत अधम गणले जातात. गुरुजींच्या आणि कुलगुरूंच्या एका प्रेमकटाक्षापुढें सम्राटांनीं दिलेलीं हीं पारितोषिकं आम्हांस तुच्छ वाटतात; म्हणून तीं आम्हांस स्वीकारतां येणार नाहींत." असें ठणठणीत बजावलें. हा अपमान सम्राटाच्या अहंकारी वृत्तीस फारच झोंबला.

"हें कामधेनु-विद्यालय म्हणजे सम्राटाविरुद्ध उघड उघड बंडखोरी शिकवणारी शाळा आहे. कुलगुरु वसिष्ठ आणि त्यांचे सहकारी ऋषि ह्यांचे प्रयत्न साम्राज्यविरोधी मनोवृत्ति निर्माण करणारे दिसतात. क्षात्रबला-पेक्षां ब्राह्मबल — ह्यालाच ते आध्यात्मिक बल म्हणतात — अधिक श्रेष्ठ आहे

असा त्यांना भ्रम झाला आहे." सम्राट विश्वामित्र क्रोधायमान होऊन बोलूं लागला.

सेनापति बलमित्र अभिवादन करून म्हणाला, "तपोवनाच्या आसमंतांत युवराजांनीं शिकारही करूं नये, ती दुर्बल हिंसा ठरते हें कुलपतींचं म्हणणं म्हणजे उघड उघड बंडखोरी आहे. ज्या क्षात्रतेजानें सम्राटांनीं रानटी टोळ्या व आक्रमक जमाती ह्यांच्यावर वचक बसविला, अनेक बलिष्ठ राज्यं जिंकलीं, त्या क्षात्रवृत्तीची उघड उघड निंदाच इथें अनेक रीतीनें चाललेली दिसते. क्षात्रबल असला अपमान कधींही सहन करणार नाहीं."

"ह्यांच्या आध्यात्मिक बलाची एकदा कसोटी पाहिलीच पाहिजे." युद्धमंत्री संग्राममित्र म्हणाला.

"छात्रांनीं सम्राटाची आज्ञा उल्लंघावी, ह्यापरता अपमान कोणता? सम्राटांनीं प्रसन्न होऊन दिलेलं पारितोषिक ह्या बटूंनीं जेव्हां नाकारलं, तेव्हां मला इतका राग आला..... माझा हात लगेच खड्गाकडे गेलासुद्धा. महाराजांच्या देणगीचा स्वीकार करण्यासाठीं स्वर्गलोकींचा इंद्र देखील अमरपुरी सोडून येईल." बलमित्र म्हणाला.

"आश्रमावर एकदम छापा घालून ह्या बंडखोरीला आळा घालण्याची आज्ञा व्हावी. हा सेवक सम्राटांची सेवा करण्यास उतावीळ झाला आहे."

संग्राममित्र अभिवादन करून म्हणाला.

"क्षात्र-धर्म आणि क्षात्र-वृत्तीचा धिक्कार करून कुलगुरु वसिष्ठ जेव्हां साम्राज्यांतून बाहेर पडून तपोवनांत आले, तेव्हां हा वृद्ध ब्राह्मण उरलेलं आयुष्य मुठींत नाक धरून अध्यात्मचिंतनांत घालवील असं वाटलं होतं. कुलगुरु म्हणून प्रतिष्ठा पावलेला हा कांटा अशा तऱ्हेनें मार्गांतून दूर होत आहे म्हणून आम्हांला बरं वाटलं. आमच्या क्षात्रवृत्तीवर चिडणारा हा अहिंसक बिब्बा एक गाय घेऊन साम्राज्याबाहेर गेला खरा; पण त्यानें

बंडखोरांची ही पैदासच निर्माण केली. शिक्षणाच्या नांवाखालीं नागरिकांच्या मुलांमुलींना त्यानें पार बिघडून टाकलं! क्षात्रबल श्रेष्ठ का आध्यात्मिक बल श्रेष्ठ असा उघड सवाल वसिष्ठानें आमच्यापुढें खडा केला आहे. ह्याचा निर्णय लागलाच पाहिजे. विदग्धराज, आपला काय विचार आहे?" सम्राटानें इतका वेळ गंभीरपणानें बसलेल्या प्रधानास प्रश्न केला.

"महाराज सुज्ञ आहेत. त्यांच्या विचारापेक्षां माझा विचार अधिक तो काय असणार? माझी विनंती अशी – आपण इथें कोणत्या उद्देशानें आलों आहोंत, आणि कोणत्या गोष्टी साध्य करावयाच्या आहेत, हें पाहिलं पाहिजे. रानटी टोळ्यांचा बंदोबस्त व साम्राज्यवर्धन ह्यांसाठीं महाराजांनीं प्रवर्तित केलेली क्षात्रवृत्ति आतां आपल्या राष्ट्रांत इतकी फैलावली आहे, कीं शेती, वस्त्र, विणकाम, इत्यादि जीवनोपयोगी वस्तूंची पैदास करणारे लोकच कमी पडून अन्न व वस्त्र ह्यांचा तुटवडा पडला आहे. परमुलुखांत लुटालूट करून अन्नवस्त्र मिळवावं, तर तोही मार्ग खुंटला आहे. परमुलूख बेचिराग होऊन त्या देशांतील दास प्रजेस अन्नवस्त्र पुरविण्याचा उलटा खटाटोप आपणांस करावा लागत आहे. त्यांना उपाशी ठेवलं तर साम्राज्याची अपकीर्ति होते. म्हणून त्यांना पोसायची जोखीम आणखी आपल्यावर पडली आहे. शेतीसारखा कंटाळवाणा, दीर्घसूत्री, परावलंबी धंदा करायला फारसं कुणी धजत नाहीं. लढवय्या वीरपुरुष अन्नाशिवाय जगत नाहीं. वस्त्राशिवाय राहात नाहीं. अन्नवस्त्र ह्यांचा दुष्काळ प्रजेलाच नव्हे, तर सैन्यालाही जाणवूं लागला म्हणून आपण ही तपोवनाकडे मोहीम काढली. कामधेनु-विद्यालयांत अन्नधान्य व वस्त्रप्रावरणं ह्यांची समृद्धि असून कराच्या रूपानें त्यापैकीं कांहीं आपण घ्यावं व जमल्यास आश्रमाला कांहीं लोभनीय सवलती देऊन त्यांतील छात्रांस अन्नवस्त्र-पैदासीच्या कामाला जुंपून कार्यभाग साधावा हा आपला हेतु." विदग्धराज क्षणभर थांबला व पुन्हा बोलूं लागला, "पण आश्रमाचे कुलगुरु लोभाला बळी पडण्याचं कारस्थान तर राहोच, पण आश्रमांतील छात्र देखील

लोभाला लालचावत नाहींत. उलट त्यांनीं उघड उघड पारितोषिक नाकारून सम्राटांच्या आज्ञेचा भंग केला. ”

“ सम्राटांच्या अपमानाचा बदला घेतलाच पाहिजे. ” बलमित्र गर्जून म्हणाला, “ अहिंसा, मुत्सद्देगिरी, आत्मतेज हीं सारीं आमच्या खड्गापुढें तुच्छ घुंगुरटीं आहेत. क्षत्रियांनीं पराक्रम करावे, ऋषिब्राह्मणांनीं त्यांच्या खुशामतीसाठीं यज्ञयाग करावे – क्षत्रियांस संतुष्ट करून दक्षिणा मिळवावी, दास व सामान्य प्रजा ह्यांच्यावर आम्हीं अधिराज्य गाजवावं, हा सनातन आचार आमच्या अंगवळणीं पडला आहे. आश्रमानें हीं सारीं बंधनं झुगारून दिलेलीं आहेत. आश्रम शिकवतो, ‘ कुणी दास नाहीं, कुणी अधिराज नाहीं. सार्‍यांना आपल्या जीवनोपयोगी वस्तु निर्माण करतां आल्या पाहिजेत. ज्याचं अन्न त्यानें उत्पन्न करावं. ज्याचं वस्त्र त्यानेंच निर्माण करावं. ’ म्हणे आश्रमांतील क्षत्रिय छात्रसुद्धा वस्त्र विणण्याचें दासकर्म करतात. ”

विदग्धराज म्हणाला, “ होय. आश्रमांतील छात्रांनीं निर्माण केलेलीं विविध प्रकारचीं हजारों वस्त्रं पाहून मी थक्क झालों. साम्राज्यांत वस्त्रांचा दुष्काळ तर आश्रमांत वस्त्रांचा सुकाळ. ”

“ म्हणूनच ही सारी वस्त्रसंपत्ति करभाराच्या रूपानें नाहींतर जबरदस्तीनें सम्राटाच्या वस्त्रागारांत आलीच पाहिजे. ” संग्रहाधीप बोलला.

“ सम्राटांना आवश्यक असलेल्या सगळ्या वस्तु कामधेनु विद्यालयांत भरपूर आहेत. आश्रम ही साक्षात् कामधेनूच आहे, हें मला मान्य आहे. ” विदग्धराज बोलला.

“ तर मग कामधेनूचंच हरण झालं पाहिजे. ” सम्राट् विश्वामित्र गर्जून बोलला. ‘ कामधेनूचं हरण, कामधेनूचं हरण, ’ हा गंभीर निनाद आसमंतांत घुमूं लागला. हा ध्वनि विलीन होतो न होतो तोंच मैत्रेय गुरुजी कांहीं छात्रांसह सम्राटाच्या भेटीस आले. ह्या भेटींत काय झालें तें पुढील प्रकरणांत पाहूं.

# ४.

" उद्यां कामधेनु-उत्सवाच्या प्रसादाला राजपरिवारास आणि सर्व सैनिकांस आमंत्रण देण्यांत आलं आहे.' ही बातमी सैनिकांत हां हां म्हणतां पसरली. सैनिक राहुट्या-राहुट्यांमधून ह्या बातमीची चर्चा करीत होते. ते पाहा एका प्रशस्त राहुटीपाशीं जमून सैनिक हास्यविनोद करीत आहेत.

" काय रे ? हा प्रसाद म्हणजे काय प्रकरण आहे ?" एका सैनिकानें पृच्छा केली.

" प्रसाद म्हणजे जेवण." दुसऱ्यानें उत्तर दिलें.

" मला नाहीं वाटत तसं. कामधेनु-उत्सवाचा प्रसाद म्हणजे पळी पळी दूध देतील." एकानें शक्कल लढविली.

" हं. त्या पळीभर दुधासाठीं उपाशी ठेवतील; म्हणजे आपलं रोजचं जेवण बुडणार." एक सैनिक म्हणाला. त्यावर दुसरा सैनिक म्हणतो, " तुझं म्हणणं खरं दिसतं. राजपरिवाराला मिळेल फार तर मिष्टान्न भोजन. आपणां सहस्रावधि सैनिकांना कुठलं आलंय् जेवण ? सम्राटाचीं कोठारं पुरीं पडत नाहींत, तिथें हा भिकार आश्रम काय देणार मेजवानी ?"

" एकूण उद्यां उपास पडणार म्हणतोस ? छान. मी आलों होतों मोठ्या आशेनें. आश्रमवनांतील कोंवळ्या कोंवळ्या हरिणांचं गोड मांस खायला मिळेल म्हणून. शिकार तर नाहींच; मात्र हें उपासाचं ताट आलं पुढें वाढून."



दुसऱ्या सैनिकानें त्याला दुजोरा देत म्हटलें, " खरं रे बाबा. नकोत ह्या स्वाऱ्या असं झालंय्. लढाई जुंपली, कीं अन्न खायला फुरसत नाहीं. लढाई आटोपून यावं तों अन्न तुटवड्याचं म्हणून मिताहार – म्हणजे उपासच. माझं आंतडं बघ कसं वाळून गेलंय् ! "

" तरीच पोटाचा घेर एवढा वाढला आहे. " त्याच्या पोटावर थाप मारून एकजण बोलला.

" घाबरूं नकोस. उद्यां अगदीं पोटभर जेव आश्रमांत. सैनिकांना कधीं मिळाली नव्हती अशी मेजवानी आहे उद्यां. माझी मुलगी सरमा आश्रमांत आहे, ती सांगत होती. "

" माझा मुलगा वृष्णि तसंच म्हणाला. "

" अरे वेड्या, म्हणजे कंदमुळं, पालापाचोळा ह्यांचं जेवण असेल ! "

" ऐका, ऐका दवंडी काय आहे ती. "

[ सैनिकऽ होऽ ! उद्यां कामधेनूच्या प्रसादासाठीं सर्व सैनिकांनीं आश्रमांत जायचं आहे. म्हणून उद्यांचा शिधा कुणीही अन्नाधिकाऱ्या-पासून घेऊं नये. ज्यांनीं घेतला असेल त्यांनीं तो शिल्लक ठेवावा. सैनिकी शिस्तीनें आश्रमांत जावं आणि तिथें शिस्तभंग करूं नये, अशी सेनापतीची आज्ञा आहे होऽऽऽ ]

" आतां झाली खात्री ? "

" एका दिवसाच्या शिध्याला लागली कात्री ? "

" अरे, पोट साफ करून ठेव आतांपासून. प्रसाद पुरे म्हणूं नये. "

सैनिकांचा हा गप्पा-विनोद चालला असतां आश्रमांत एकच गडबड उडाली होती.

आश्रमीय धर्माप्रमाणें कामधेनु-महोत्सवाच्या प्रसादाला जे अतिथि-अभ्यागत आले असतील त्यांना बोलावण्यांत येत असे. त्याप्रमाणें मैत्रेय गुरुजी छात्रांसह सम्राट् विश्वामित्राला आमंत्रण देण्यास गेले. विश्वामित्र रागावला होता. तो आमंत्रण स्वीकारील किंवा कसें ही शंका होतीच.

मैत्रेयांनीं आमंत्रण दिलें. "मागाहून काय तें कळवतों" असें राजमंडळा-कडून उत्तर मिळालें.

सम्राटाच्या सल्लागार मंडळींत काय चर्चा झाली तें कळायला कांहीं मार्ग नाहीं. राजगुह्य कोणाला आणि कसें समजणार? गुप्त खलबतांत काय शिजलें कोणास ठाऊक? पण प्रहरा दीड प्रहरानें आश्रमाकडे निरोप गेला, "सम्राटानें राजपरिवारासह प्रसादाचं आमंत्रण स्वीकारलें असून स्वत: विश्वामित्र आश्रमाला भेट देण्यासाठीं सकाळीं तिकडे येणार आहेत. आश्रमीय छात्रांचा शिक्षणक्रम पाहाण्याचा सम्राटाचा मनोदय आहे."

हा निरोप पोचतांच गडबड उडाली आश्रमांत. सहस्रावधि सैनिकांना प्रसाद देण्याचा कार्यक्रम नीट पार पडावा म्हणून छात्रवर्ग उद्योगास लागला. भेटीविषयीं आचार्य मंडळींत गंभीर चर्चा सुरू झाली. कुलपति वसिष्ठ स्थितप्रज्ञ, ज्ञानी, सत्त्वधीर; पण त्यांनादेखील हा प्रसंग कसा पार पडतो ह्याची चिंता वाटूं लागली.

वेत्रपाणी गुरुजी छात्रांना सैनिकांशीं व राजमंडळाशीं कसें वागावें, त्याचें आतिथ्य कसें करावें हें सांगत होते. आश्रमीय नीति व नागरिक-नीति ह्यांमधील फरक सांगत होते. अतिथींजवळ कसें वागावें हें छात्रांना पढवीत होते.

पाकशाखेचे छात्र अन्न, धान्य व पाकक्रिया ह्यांची तयारी करीत होते. कारुशाखेचे छात्र मंडप उभारीत होते. सगळीकडे कार्याच्या उत्साहाची गडबड उडाली होती.

दुसऱ्या दिवशीं सम्राट लव्याजम्यासह आश्रमांत आला. प्रार्थना-वेदिकेपाशीं कुलगुरु वसिष्ठ, सर्व आचार्य आणि छात्रगण हे उपस्थित होते. विश्वामित्रानें कुलगुरूंना अभिवादन केलें. त्यानंतर राजकुमार आणि मंत्रि-मंडळानें अभिवादन केलें. वसिष्ठांनीं सर्वांस आशीर्वाद देऊन सम्राटाचें व राजकुमारांचें कुशल विचारलें. राजमंत्र्यांची ओळख करून देण्यांत आली.

ब्राह्मधर्माचा साक्षात् अवतार वसिष्ठ आणि छात्रधर्माचा नीस्सीम उपासक विश्वामित्र ह्या दोन पुरुषांची ही भेट मोठी सलोख्याची वाटली. आश्रमाकडून सम्राटाची अतिथिपूजा झाली.

सम्राट् प्रथम कामधेनूच्या दर्शनास गेला. तें स्वर्गीय दिव्य रत्न पाहून त्याच्या मनांत विलक्षण खळबळ माजली असावी असें दिसलें. तेथेंच जवळ धेनुखिल्लार व वृषभखिल्लार होतें. तीं धष्टपुष्ट खिल्लारें आश्रमाचे बहिश्चर प्राणच होते. कित्येक नागरिकांचीं मुलें त्या धेनुशाखेंत काम करीत होतीं. गोक्षीराचे मोठमोठाले घट तेथें भरलेले होते. पलीकडे दुग्ध मंदिरांत दह्याचे घट, लोण्याच्या भेली आणि ताकाचे माठ भरले होते. हीं सर्व कामें छात्रगण गुरुजींच्या देखरेखीखालीं करीत होता. खुद्द सेनापति बलमित्र ह्याचा पुत्र गोरक्ष हा कामधेनूची सेवा करीत होता. धेनुखिल्लाराची व्यवस्था त्याच्याकडे होती. आपल्या मुलाला गायी वळण्याचें काम दिलेलें पाहून बलमित्र रागावला. त्यानें आचार्यांस विचारलें, "माझ्या मुलाला मीं शस्त्रास्त्र-शिक्षणासाठीं इथें ठेवलं असतां त्याला गुरं वळायला लावतां ?"

आचार्य म्हणाले, "आश्रमीय नियमाप्रमाणें शस्त्रास्त्रांचं शिक्षण सर्वच छात्रांना दिलं जातं. तसं त्यालाही दिलं आहे. त्यांतल्या त्यांत त्याचा कल पाहून दुसऱ्या अनेक जीवनकलांचं शिक्षण दिलं आहे. आश्रमांत उच्चनीच हा भावच नाहीं. नागरिकपद्धतीप्रमाणें सेनापतीच्या मुलाला सैनिक शिक्षण आणि गुराख्याच्या मुलाला गोपालनाचं शिक्षण ही पद्धत इथें नाहीं. छात्राच्या सगळ्या जीवनकलांचा विकास व्हावा, तो सेवावृत्तीचा, निर्भय, सत्यव्रती कसा होईल हेंच आम्ही पाहातों."

सेनापति पुटपुटले, "छान ! मी सैन्यांचे कळप घेऊन मुलुखगिरी करतों नि माझा मुलगा गायी–बैलांचे कळप घेऊन कुरणं हिंडणार. चांगलं .... छात्रधर्माचं चांगलं विडंबन चालवलं आहे आश्रमानें."

" राजधानींत दुधाचा नि लोण्याचा केवढा दुष्काळ पडला आहे. इथें पाहा लोण्याचे डोंगर उभारले आहेत. सैनिकांना लोणी जखमेवर लावायला मिळत नाहीं तर खायला कुठलं ?" संग्रामसिंह विदग्धराजाजवळ बोलत होते. ते त्यास थांबवून म्हणाले, " आतां इथें फक्त बघायचं काय काय आहे तें."

" ही संयमी वृत्ति फक्त मुत्सद्दी पुरुषांत असते. क्षात्रवृत्तीला असला छद्मीपणा येत नाहीं."

राजपरिवार तेथून वस्त्र-सूत्र शाखेंत गेला. छात्र सूत्रचक्रावर सूत कांतीत होते. गुरुजी सर्वांनीं वस्त्रस्वावलंबी कां व्हावें हें मुलांना सांगत होते. विषयावरून विषय निघतां ईशावास्योपनिषदांतील—

ॐ ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ॥
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मागृधः कस्यचिद्धनम् ॥

( अर्थ —ह्या पृथ्वीवर ज्याला म्हणून वस्तु म्हणतात तें सर्व ईश्वरानें व्यापलें आहे. म्हणून त्याचा त्याग करून पावन कर. दुसऱ्याच्या धनाची आकांक्षा धरूं नकोस. )

ह्या मंत्रावर विवेचन चालू असतां राजपरिवारासह विश्वामित्र तेथें आला.

" हें सर्व जग ईश्वराचं आहे. त्यावर कुणाचाही धनीपणाचा अधिकार नाहीं. अमुक भागाचे आपण अधिपति आहों असं मानणं हा ईश्वरी सत्तेशीं विद्रोह आहे. " गुरुजी विवेचन करीत असतां एका छात्रानें शंका विचारली,

" मग गुरुजी, राजे किंवा सम्राट् जगावर अधिकार गाजवतात तो ईश्वराशीं विद्रोह समजायचा का ?"

" होय. अधिकारतृष्णा, धनतृष्णा, साम्राज्यतृष्णा ह्या आसुरी प्रवृत्ति असून त्या त्याज्य होत. " गुरुजींनीं उत्तर केलें. गुरुजी पुढें म्हणाले, " जें दुसऱ्याचं असेल त्याचा आपल्या भोगासाठीं संग्रह करणं हें ईश्वरालाच लुबाडणं होय !"

" मग पशु नि आपण ह्यांत फरक तो काय? पशु संग्रह करीत नाहींत. हरणं गवत सांठवीत नाहींत. पक्षी धान्यसंग्रह करीत नाहींत. " अनुशासन म्हणाला.

" तसं पाहिलं तर आश्रमानें तरी अन्नधान्याचा संग्रह केलाच आहे की! " एका छात्रानें शंका विचारली.

मृगपाद मध्येंच म्हणाला, " अनुशासना, पशुपक्षी संग्रह करीत नाहींत तशी नवी निर्मिति पण करीत नाहींत. "

गुरुजी म्हणाले, " तसं पाहिलं तर सिंहव्याघ्र हे पशु दुसऱ्याचा प्राण घेऊन आपली उपजीविका करतात. "

" मग सिंहानें काय गवत खावं? हत्तीच्या गंडस्थळांतील मोत्यांचा घास खाणं हीच तर त्याची स्वयमेव मृगेंद्रता. तो उपाशी मरेल, पण गवतपाला खाऊन नाहीं जगणार! पराक्रम आणि बलशालित्व ह्यांना ईश्वरी जगांत स्थानच नाहीं म्हणायचं! सिंहाचा पराक्रम हा माणसाला आदर्श असाच आहे. वनराजाला तुम्ही अहिंसेचे धडे देणार काय?" अनुशासन तावातावानें बोलत होता.

गुरुजी म्हणाले, " म्हणूनच तो पराक्रमी असला तरी पशु. तुला कुणीं विचारलं, तूं सिंह होतोस कीं मानव होतोस? तूं काय उत्तर देशील?"

" अनुशासना, तूं सिंह हो! दोन चार बाण मारून मी तुझे दांत पाडून तुला बोथरा करीन नि मग नखं उपटून तुला लुळा करीन. मग सिंहाच्या गळ्यांत दोरी बांधून नगरांत खेळ करायला घेऊन जाईन. " मृगपादानें असा उपहास करतांच सारे छात्र हसूं लागले.

गुरुजी म्हणाले, " हें पाहा, वादांत प्रतिपक्षाचा असा अधिक्षेप करणं हें ठीक नव्हे. "

" तसं नव्हे गुरुजी ". मृगपाद बोलूं लागला, " हा नेहमींच क्षात्रवृत्ति, क्षात्रतेज ह्यांची फार स्तुति करतो. ब्राह्मधर्म नि आत्मतेज ह्यांची कुचेष्टा हा करतो. "

" ब्राह्मधर्म श्रेष्ठ का क्षात्रधर्म श्रेष्ठ हा वादाचा विषय तूं उत्पन्न केलास मृ॰पादा. " गुरुजी पुढें म्हणाले, " निर्भयता हा गुण दोन्ही वृत्तींत आहे. पण ब्राह्मवृत्ति पराभूत होत नाहीं. क्षात्रवृत्ति अधिक बलवान् क्षात्रतेजापुढें पराभूत होते. "

" आणि आत्मतेजापुढें ? " एक छात्र उद्गारला.

" आत्मतेजापुढें दिपून जाते, फिकी पडते. ब्राह्मधर्म हा कुणाच्या पराभवाकरितां नाहींच. तो विरोधकाच्याही उद्धाराकरितां आहे. " गुरुजींचें हें उत्तर ऐकून राजपरिवारांत खळबळ उडाली. सम्राट् रागावून म्हणाला, " विदग्धराज, नाहीं ऐकवत मला हें. उघड उघड उपमर्द आहे ह्यांत आमचा. विद्यालयामधून हें सम्राटाच्या विद्रोहाचं शिक्षण देतात. ह्याचाही तीव्रतेनें विचार करायला हवा. ह्या स्थळीं उभं राहाण्याची सुद्धा आमची इच्छा नाहीं. "

" राजाधिराज महाराज ! आपण पाह्यला आणि ऐकायला आलों आहोंत. चित्त शांत व्हावं. संयमानें पराक्रमाची धार तीव्र होते. उताविळीनें राजकार्य बिघडेल. चला, आपण विश्रांति घेऊं शिबिरांत जाऊन. " विदग्धराजाची विनंती मान्य करून सम्राट् परिवारासह शिबिराकडे गेला. हें पाहून एक छात्र म्हणाला, " आमची चर्चा ऐकून सम्राट् कां रागावले ? आमच्या वर्तनांत कांहीं अविनय का होता ? "

दुसरा छात्र म्हणाला, " अविनय नव्हता, निर्भयता होती. सत्याचा आविष्कार होता. "

" आपल्या वर्तनाचे आपणच गोडवे गाणं हा मात्र उद्धटपणाचा एक प्रकार आहे....बरं, आजचा पाठ पुरे. पुढील प्रसादाच्या कार्यासाठीं आपण तिकडे जाऊं. "

* * *

सूर्य माध्यान्हीं आला. कुलपति वसिष्ठ अग्निशाळेंत अग्निउपासनेस गेले. इकडे छात्रांनीं आश्रमवेदीच्या भव्य मंडपांत पात्रांची तयारी केली.

राजदूत—राजप्रेषित मधून मधून आश्रमाच्या आवारांत येऊन टेहेळणी करीत होते. त्यांनीं वार्ता नेली कीं सम्राट् व राजपुत्र ह्यांची भोजनाची व्यवस्था स्वतंत्र अशी ठेवली नसून सैनिक, नोकर, आश्रमीय छात्र आणि राजपरिवार ह्या सर्वांची एकाच प्रकारची व्यवस्था ठेविली आहे !

मोठीच खळबळ उडाली ह्या बातमीनें. सेनापति व सैनिक एका पंक्तीला ? राजाधिराज सम्राट्—ज्याच्या पायांचें दर्शनसुद्धा घडायचें नाहीं सामान्य लोकांना—तो पृथ्वीपति छात्रांच्या—पोरांच्या—पंक्तीला ? ही कल्पनाच सहन होण्यासारखी नव्हती. सम्राटाचा अहंभाव जागृत झाला. कुलगुरूंनीं सम्राटाचा असा अपमान करण्यासाठींच हा प्रसादसमारंभ मुद्दाम घडवून आणला. ह्या अपमानाचा मोबदला इथल्या इथें घेतलाच पाहिजे ही विचारप्रणालि शिबिरांत जोरावली—अपमानाचा बदला घेण्याची भाषा खुद्द सेनापतीच्या मुखांतून निघाली.

विश्वामित्राच्या राजमंडळांत खलबतें सुरू झालीं. प्रधान मंत्री विदग्धराज मात्र ह्या बेताच्या विरुद्ध होता. त्यानें सम्राटाला विनंती केली, " महाराज, आश्रमासारख्या संस्थेवर—जिचें ब्रीद अहिंसा-सेवा-प्रेम हें आहे—हल्ला करणं हें मला बरं वाटत नाहीं. त्यांनीं केली आहे आपल्या सत्काराची तयारी. तिथें आपण काय शस्त्रास्त्रं घेऊन जाणार तो सत्कार स्वीकारायला ? ज्या उद्देशानें आपण इथें आलों आहोंत तो कसा साधेल ? आश्रमाची सारी ऐपत आपण पाहून तरी घेऊं. एवढ्या सहस्रावधि सैनिकांना जेवण देण्याइतकं अन्नधान्य आश्रमापाशीं असेल, तर.... "

" बलात्कारानें लुटून घेऊं ! क्षात्रधर्माचं तेज दाखवूं ह्या ऋषिमंडळींना. " संग्रामसिंह उद्गारला.

" छे ! छे ! " विदग्धराज निषेध करून म्हणाले.

" जिथें नखाचं काम आहे, तिथें कुऱ्हाड कशाला ? कसं झालं तरी वासिष्ठ हे महाराजांचे कुलगुरु आहेत. त्यांच्याकडून कांहीं आगळीक झाली

नाहीं. असं असून आपण आश्रमावर आक्रमण केलं तर जगांत आपली नाचक्की होईल. "

"हा एक विचाराचा प्रश्न आहे खरा. कुलगुरु म्हणून वसिष्ठ आम्हांला वंद्य आहेत. धर्माप्रमाणें ते अवध्यही आहेत. म्हणून त्यांच्याकडून प्रत्यक्ष अपराध घडेपर्यंत वाट पाहिली पाहिजे. तूर्त ठरल्याप्रमाणें हा प्रसंग निभावून नेऊं." विश्वामित्राचें हें बोलणें कांहीं मंत्र्यांना रुचलें नसलें तरी सम्राटाच्या विरुद्ध बोलण्याची त्यांची तयारी नव्हती म्हणून ते गप्प बसले.

विश्वामित्र राजपरिवारासह आणि सैन्यासह आश्रमांत कामधेनु-महोत्सवाच्या प्रसादास गेला.

पंक्ति बसल्या. स्वतः वसिष्ठांनीं सर्वांचा प्रेमानें सत्कार केला. ते सम्राटापासून तों सैनिकापर्यंत सगळ्यांचा परामर्ष घेत होते. सर्व राजपरिवार आणि सम्राटही आपल्याच पंक्तीला जेवायला बसलेला पाहून सैनिकांस मोठी अपूर्वाई वाटली !

साक्षात् अन्नपूर्णादेवी आश्रमांत अवतरली आहे असेंच सर्वांना वाटलें. दूध, लोणी, घृत ह्या सात्त्विक द्रव्यांची व फळफळावळीची रेलचेल उडाली होती. सैनिकच काय, पण राजपरिवारखुद्धा त्या सात्त्विक, मधुर आणि प्रेमानें वाढलेल्या प्रसादानें संतुष्ट झाला. सैन्य शिबिराकडे परतलें. राजपरिवार कुलगुरूंच्या पर्णकुटिरांत वसिष्ठांचा आशीर्वाद घेण्यासाठीं थांबला.

"राजा, तुझ्या भेटीमुळें मला फार आनंद झाला. फार दिवसांनीं तूं भेटलास. सर्वांचं कुशल आहे ना ? हे छोटे राजकुमार आनंदांत आहेत ना ?" वसिष्ठ प्रेमळपणें बोलत होते.

विश्वामित्र अभिवादन करून म्हणाला, "गुरो, आपल्या कृपेनें सर्वांचं कुशल आहे. राजकार्यामुळें भेटीचा योग आला नाहीं. अग्निसेवा व गोसेवा हीं निर्विघ्नपणें पार पडत आहेत ना ? आपल्यासारख्यांचं रक्षण करणं हें आम्हां क्षात्रधर्मीयांचं प्रमुख कर्तव्य आहे. आश्रमांतील छात्र व गुरु कुशल आहेत ना ? "

"होय. अग्निदेवाच्या आणि धेनुमातेच्या कृपेनें सर्व ठीक आहे. आश्रम पूर्ण निर्वैर असल्यामुळें आणि आम्ही सर्वच अहिंसेचे उपासक असल्यामुळें पूर्ण निर्भय आहोंत." वसिष्ठ म्हणाले.

विदग्धराज अभिवादन करून म्हणाले, "सम्राटांनीं आश्रमाला मुद्दाम भेट देण्याचं कारण असं.... कांहीं रानटी टोळ्या आश्रमावर आक्रमण करून लूटमार करणार आहेत असं वृत्त आमच्या गुप्तहेरांनीं आणलं आहे. आश्रम इतका दूर आहे, कीं त्याचं रक्षण करणं दुरापास्त आहे. तेव्हां मी म्हणतों, आश्रमापाशीं असलेला अन्नवस्त्र-संग्रह राज-भांडारांत ठेवला तर सुरक्षित राहील!"

"आश्रमाचं रक्षण करण्यास कामधेनूची कृपा समर्थ आहे." वसिष्ठ म्हणाले.

"साम्राज्यवर्धनाचा महान् उद्योग महाराज करीत आहेत. त्याला आश्रमानें कांहीं मदत करायला हवी. कुणीं कांहीं म्हटलं तरी आश्रमाचं कार्य निर्विघ्नपणें चालायला महाराजांचा पराक्रम हेंच कारण आहे. शिवाय कैक वर्षं आश्रमानें राजभाग (खंड) दिलेला नाहीं." विदग्धराज म्हणाले.

"मग असं उघड म्हणाना, आश्रमाकडून खंड वसूल करण्यासाठीं सम्राट् इथें आले आहेत." वेत्रपाणी गुरुजी म्हणाले.

"हें सारं धन कामधेनूच्या कृपेमुळें आश्रमाला प्राप्त झालं आहे. आश्रम अपरिग्रही आहे. त्याचप्रमाणें तो स्वतंत्र आहे. तो कुणाला खंड देण्यास बांधलेला नाहीं." वसिष्ठ शांतपणें म्हणाले.

"ऐकलंत विदग्धराज? म्हणे आश्रम स्वतंत्र आहे! सम्राटांच्या कृपेनें मिळालेल्या भूमीवर आश्रम उभारला आहे हें कुलगुरु विसरलेले दिसतात!" हें बलमित्राचें बोलणें ऐकून वसिष्ठांच्या शांत मन:सागरावर क्रोधाच्या लाटा तरंगूं लागल्या. ते संयम करून म्हणाले, "ही सर्व भूमि ईश्वराची आहे. आम्ही कुणाचं घेत नाहीं. संग्रह उपभोगासाठीं करीत

नाहीं. इथें येणाऱ्या कुणालाही आश्रम थारा--निवारा देतो. कामधेनूच्या कृपेनें कुणाचंही उणं पडणार नाहीं."

"तर मग त्या कामधेनूचीच मागणी मी कुलगुरूंजवळ करतों." विश्वामित्र म्हणाला.

"काय? कामधेनूची मागणी?" मैत्रेय गुरु आश्चर्यानें उद्गारले.

"होय. कामधेनूची मागणी." विश्वामित्र निश्चित स्वरानें बोलला.

"छे! कालत्रयीं शक्य होणार नाहीं." सारे ऋषि ओरडले.

"शक्य झालंच पाहिजे." विश्वामित्र म्हणाला.

"सम्राटाची आज्ञा मानलीच पाहिजे." सेनापति म्हणाला.

"अशक्य, त्रिवार अशक्य. सम्राट् हा अविचार करीत आहेत." मैत्रेय गुरुजी म्हणाले.

"हा अपमान आहे सम्राटांचा." विदग्धराजानें रागानें म्हटलें.

वसिष्ठ शांतपणें म्हणाले, "हा मानापमानाचा प्रश्न नाहीं. कामधेनूचा मी पालक आहें, मालक नव्हे. ब्राह्मधर्माच्या परिपालनासाठीं देवानें दिलेली ती ठेव आहे. ती कुणाला कशी देतां येईल?"

"क्षात्रधर्माला हवं तें घेतां येतं." विश्वामित्र म्हणाला. वसिष्ठ क्रोधानें म्हणाले, "ठीक आहे. बळानें नेतां आली तर न्या कामधेनु."

"आमच्या बळाविषयीं शंका आहे कुलगुरूंना? तर मग कामधेनूचं हरण झालंच पाहिजे. सेनापति, कामधेनूला ह्याच क्षणीं शिबिरांत न्या." विश्वामित्र गर्जून बोलला.

"राजा, तुला हें शक्य होईल का ह्याचा विचार कर."

"पराक्रमाला क्षुद्र गोष्टीसाठीं विचार नाहीं करावा लागत."

"जा रे. सैनिकांना म्हणावं कामधेनूला दाव्यांनीं बांधून शिबिराकडे न्या." बलमित्रानें आज्ञा केली.

"काय? सम्राट् कामधेनूचं हरण करणार?" सगळे आचार्य त्वेषानें ओरडले.

"होय!" विश्वामित्र गर्जून म्हणाला.

# . ५ .

आश्रमाच्या आसमंतांत प्रतिध्वनि उमटला, " कामधेनूचं हरण ! " आश्रमीय गुरुजन ह्या प्रतिध्वनीनें आश्चर्यमूढ झाले. प्रसादाचा कार्यक्रम आवरून कृतकृत्य झालेले आश्रमीय छात्र विनोद–विश्रांति घेण्यासाठीं ठिक-ठिकाणीं टोळ्या टोळ्या करून बसले होते. मुली एकमेकींशीं गप्पा, विनोद करीत होत्या. कोणी सैनिकी जेवणपद्धतीचें वर्णन करीत होत्या. कोणी राजपरिवाराच्या वागणुकीचें शब्दचित्र काढीत होत्या. अकस्मात् त्यांच्या कानांवर " कामधेनूचं हरण " ही भीषण गर्जना पडली. दुधाच्या पेल्यांत मिठाचा खडा पडावा तसें त्यांच्या आनंदावर विरजण पडलें. अपेक्षा नसतां फुललेल्या उपवनांत झंझावात घुसावा, वेली व कुंज हीं सारीं झोडपून निघावीं, आनंदी फुलपांखरें भयभीत व्हावीं, तशी त्या मुलांची स्थिति ह्या गर्जनेनें झाली, असें म्हणतां यायचें नाहीं; कारण ते छात्र कृत्रिम वातावरणांत वाढलेले भीतीचे बुडबुडे नव्हते. जीवनाचा सर्वांगीण विकास झालेले निर्भयतेचे झुंझारवीर होते. त्यांच्या स्थितीचें वर्णन करायचें झालें तर असें करतां येईल. निर्भयपणें गुहेच्या तोंडाशीं खेळणाऱ्या सिंहाच्या बच्चयांना एकाएकीं शिकारी धनुष्याचा टणत्कार ऐकूं आला, कीं ते ज्या निर्भय सावधतेनें एकमेकांकडे पाहातात, तसे ते छात्र एकमेकांकडे पाहात होते.



ह्या भीषण गर्जनेचा अर्थ तरी काय ? सम्राट् विश्वामित्र कुलगुरूंच्या कुटिराकडे आशीर्वाद मागण्यासाठीं जातो काय? सारे गुरुजन खिन्न होतात काय? आणि "कामधेनु-हरणा" ची गर्जना उठते काय ? छात्रांना फार वेळ संशयांत राहावें लागलें नाहीं. कृषिकाचार्य ऋषि खिन्न मनानें आणि जड पावलानें जात होते, त्यांना गांठून छात्रांनीं त्यांना ह्या प्रकारची हकीकत विचारली. त्यांनीं इत्थंभूत ती सांगितली. सम्राट् विश्वामित्र आपल्या क्षात्रबळाच्या सामर्थ्यानें कामधेनूचें हरण करणार आहे.... आणि ही घटना त्वरित घडून यायची आहे हें छात्रांच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं.

कामधेनु ही आश्रमाची माता, आश्रमाची अन्नपूर्णा, आश्रमाची देवता, साऱ्या छात्रांचें प्रेमस्थान, साऱ्यांचें सेवास्थान, साऱ्यांचें पूजास्थान; ती कामधेनु सम्राट् नेणार – जबरदस्तीनें नेणार, पाशवी बळावर नेणार, कोणाला हें सहन करवेल ? कोणाला पाहावेल ? अहिंसाव्रताचें पालन करणारे गुरु व छात्र कामधेनूच्या हरणाला कोणत्याही प्रकारचा अडथळा आणणार नाहींत, अशी सम्राटाची कल्पना झाली असावी. सम्राट् विश्वामित्र व त्याचा मंत्रिपरिवार ह्यांना अहिंसाव्रत ही एक दुबळी वृत्ति आहे असें वाटत होतें. ह्या दुर्बलांकडून कोणत्याही प्रकारच्या प्रतिकाराचा प्रयत्न होणार नाहीं, आपण सहजासहजीं कामधेनूचें हरण करूं अशा कल्पनेनें इतक्या उद्दामपणें त्यानें कामधेनूच्या हरणाची घोषणा केली.

आश्रमानें सर्वकाळ स्वीकारलेली अहिंसा ही दुबळ्यांची भित्री अहिंसा नव्हती. निर्भय वृत्तींतून निर्माण होणारी आत्मबलशाली, सदा विजयी अहिंसा होती. अशा अहिंसेचा साक्षात्कार त्या हिंसकांना कधींच झाला नव्हता. सम्राट् रागारागानें आश्रमांतून निघून शिबिराकडे गेला होता. आपले सैनिक पाठवून तो कामधेनूचें हरण करणार ह्यांत शंका उरली नव्हती. विचाराला वेळ उरला नव्हता. तडजोडीची आशा नव्हती. तडजोड तरी कसली करणार ? ह्या वेळीं तडजोड करणें म्हणजे आश्रमानें

आपलें सत्त्व गमावणें होय ! सत्त्व गमावून केलेली तडजोड हा प्रच्छन्न पराभवच आहे. असा पराभव आश्रम कां स्वीकारील ?

आश्रमाला त्वरित निर्णय घेणें जरूर होतें. त्या निर्णयाला कुलपतींची संमति मिळवावयाची होती. आश्रमाचे प्रमुख घटक छात्र; गुरु व कुलपति हे मार्गदर्शक. आश्रमीय शिक्षणाचा छात्रांवर झालेला परिणाम कसोटीला लावणारा हा प्रसंग होता. छात्रांचा समुदाय निर्णय घेण्यासाठीं प्रार्थना-वेदीपाशीं जमला. सर्वांच्या मुद्रा गंभीर व निश्चयी दिसत होत्या. सर्वांत अधिक गांभीर्य गोरक्षाच्या मुद्रेवर दिसत होतें. तो साक्षात् कामधेनूचा सेवक. तो छात्रांना उद्देशून म्हणाला, "सम्राटानें आपल्या प्रिय मातेचं — कामधेनूचं हरण करावं ही भीषण महत्त्वाकांक्षा व्यक्त केली आहे. त्याचं सैन्य इतक्यांत कामधेनूच्या अपहरणासाठीं इकडे येईल; तत्पूर्वी आपण निर्णय घेऊन काय करायचं तें ठरविलं पाहिजे. आपल्या निर्णयाला कुलपतींचा आशीर्वाद असला पाहिजे. 'कामधेनूचं हरण होत असतां आपण काय करायचं? तें होऊं द्यायचं किंवा नाहीं' हा प्रश्न आपल्यापुढें उभा आहे. ह्याचा निर्णय आपण घेऊं या."

"विचार कसला करायचा ?" हिरण्मयी म्हणाली, "कांहीं झालं तरी कामधेनूचं हरण आपण होऊं द्यायचं नाहीं हाच निर्णय."

"पण रक्षण कसं करायचं ?" अनुशासनानें पृच्छा केली. तो पुढें म्हणाला, "जर कामधेनूचं रक्षण करायचं झालं तर सैनिकी बळापुढें आपलं बळ कसा टिकाव धरील ? आपणांस शस्त्रास्त्रं वापरण्याची आज्ञा कुलगुरु देतील का ?"

मोठमोठ्यानें हसत मृगपाद बोलला, "अरे बाबा ! त्या सैनिकांना लोण्याच्या गोळ्यांनीं मारूं नि दुधाचे फवारे सोडूं. ते दूध-लोण्याला लालचावलेले सैनिक लोणी खात राहातील आणि दूध पीत बसतील आ करून. लोण्यानें त्यांचे हात बुळबुळीत झाले, कीं बाण कसे सोडतां येतील त्यांना ? आज जेवतांना नाहीं का पाहिलंस; लोण्यानें हात

माखल्यामुळें सैनिकांना फळं देखील सोलतां येत नव्हतीं. त्यांच्या हातून तीं निसटत होतीं. "

ममता रागावून म्हणाली, "मृगपादा, ह्या भलत्या प्रसंगीं तुला थट्टा कशी सुचते ?" शरपाद नांवाचा लहानसा शिष्य प्रार्थनावेदीवर उभा राहून म्हणाला, "आमच्या कामधेनूचं रक्षण करण्यासाठीं आम्ही आपलं रुधिर सांडूं. आमच्या अंगांत रक्ताचा एक बिंदु शिल्लक आहे तोंवर कामधेनूच्या अंगाला स्पर्श करण्याची कोणाची छाती आहे ? आमचं रक्त सांडण्याची तरी अनुज्ञा कुलगुरु देतीलच की. इतक्या सहस्रावधि छात्रांचं रक्त सांडलं, तर सैनिकच काय, सारं विश्व वाहून जाईल. छात्रहो ! कामधेनूसाठीं आत्मबलिदान करायला आपण तयार असलं पाहिजे. प्रथम मी आपलं बलिदान सैनिकांच्या हत्यारी वृत्तीपुढें करायला सिद्ध आहें."

तारांकिता म्हणाली, "धन्य ! शरपादा, धन्य तुझं धैर्य !"

सरमा म्हणाली, "तारांकिते, दुसऱ्याला धन्यवाद देऊन स्वतःची चामडी बचावण्याचा तुझा प्रयत्न आहे वाटतं ? तुझे वडील सम्राटाच्या राज्यांतील मोठे प्रतिष्ठित महाजन आहेत. महाजनांची तूं कन्या. तूंच जर दुसऱ्याला धन्यवाद देऊन स्वस्थ बसलीस, तर महाजनांचा पंथ उजळ माथ्यानें पुष्कळजण स्वीकारतील.

तारांकिता म्हणाली, "माझ्या बोलण्याचा मोठ्या चातुर्यानें तूं विपर्यास केलास खरा. पण शरपादाला धन्यवाद देण्यांत माझा तसा हेतु नव्हता."

हा संवाद ऐकून वृष्णि म्हणाला, "हें पाहा, मुत्सद्दी लोकांच्या भाषेप्रमाणें हेतु शोधण्याच्या चर्चेंत वेळ घालवून मुख्य प्रश्नाकडे दुर्लक्ष का करायचं आहे ? कामधेनूच्या हरणाचं येणारं संकट कसं टाळावं हा आपल्यापुढें प्रश्न आहे."

हिरण्मयी म्हणाली, "मला वाटतं, आश्रमानें सम्राटाला अन्न-वस्त्राची खंडणी देऊन संतुष्ट करावं, म्हणजे तो कामधेनु-हरणाचा हट्ट सोडील."

"व्यर्थ आहे ही आशा. हिंसेच्या मदानें मत्त झालेला पुरुष तडजोडीला तयार नसतो." शार्ङ्गधर नांवाचा प्रौढ छात्र बोलला.

"मग असं करतां येईल. कामधेनूला आतांच्या आतां आपण आश्रमीय अरण्यांत गुप्त जागीं नेऊन ठेवूं, म्हणजे ती सैनिकांना सापडणारच नाहीं. मग काय करतील?" चारुवदन नांवाचा एक लहानसा चुणचुणीत छात्र बोलला.

गोरक्ष म्हणाला, "चारुवदनाच्या बालबुद्धीप्रमाणें त्यानें सुचविलेली युक्ति बरोबर आहे. पण त्यामुळें हा प्रश्न कायमचा सुटत नाहीं. थोडा वेळ आपण सैनिकांना चकवूं शकूं. शिवाय अहिंसेच्या उपासकांना असल्या छद्मीपणानें आपला बचाव करणं शोभत नाहीं. शूरपणानें कामधेनूचा बचाव करूं. काय करायचं तें उघड उघड करूं. मला वाटतं, आपापसांत चर्चा करण्यापेक्षां कुलपति वसिष्ठ महामुनि ह्यांनाच काय करावं तें विचारूं."

सर्वांना तो विचार पटला. सारे छात्र वसिष्ठांच्या पर्णकुटीकडे गेले. महामुनि वसिष्ठ गंभीर चिंतनांत मग्न होते. छात्रांच्या आगमनानें त्यांची चिंतनसमाधि उतरली. छात्रांनीं अभिवादन केलें. गुरु शिष्यांकडे व शिष्य गुरूंकडे पाहात होते. जणूं काय नेत्रांनीं ते एकमेकांशीं बोलत होते. गंभीर प्रसंगीं मनुष्य तोंडानें जें बोलतो त्यापेक्षां डोळ्यांनींच प्रगट होणारे त्याचे भाव अधिक स्पष्ट होतात. छात्रांच्या नजरेंतून ओसंडणारी तीव्रता गुरुजींना दिसून आली. गुरुजींच्या नजरेंत मात्र सत्तीनें उत्पन्न झालेलें वैराग्य विलसत होतें. प्राप्त प्रसंगानें उत्पन्न झालेली अशांति लपत नव्हती. ते गंभीर स्वरानें म्हणाले,

"माझ्या प्रिय छात्रांनो! तुम्ही मजकडे कां आलांत तें मी समजलों. कामधेनु-हरणाची घोषणा ऐकून तुम्ही व्यथित झालां आहांत, तसा मीही व्यथित झालों आहें."

“आमच्या मातेचं रक्षण कसं करावं हें विचारण्यासाठीं आम्ही आलों आहोंत!” गोरक्ष म्हणाला.

वसिष्ठ म्हणाले, “कामधेनु ही सागरमंथनांतून निघालेलं एक रत्न आहे.' तिच्या दिव्य शक्तीचा उपयोग कुणीं स्वार्थी बुद्धीनें वैयक्तिक वैभवासाठीं करूं नये अशा बुद्धीनें देवांनीं ती मला दिली. प्रत्यक्ष इंद्राला सुद्धा ती दिली नाहीं. मीं तिचा स्वीकार केल्यावर सम्राटाच्या मदतीनें चालणारं माझं जीवन, नाहीं म्हटलं तरी, ओशाळगतीचंच होतं. त्या जीवनाचा' त्याग करून' हा आश्रम काढला. जास्तींत जास्त निःस्वार्थ बुद्धीनें लोकशिक्षणाचं कार्य चालू केलं. हें माझं लोककार्य कामधेनुमातेला संमत नसेल तर ती ,स्वतंत्र आहे आपल्या इच्छेप्रमाणें वागायला. जर तिलाच सम्राटाकडे जायचं असलं तर तिला कोण अडवूं शकणार आहे? बरं, तिची जर आश्रम सोडण्याची इच्छा नसली तर तिला कोण बलात्कारानें हरण करूं शकणार? आश्रमाला तिच्याबद्दल प्रेम राखतां येईल; आसक्ति नाहीं राखतां येणार. कामधेनूच्या इच्छेचा कौल जर आश्रमाच्या बाजूनें पडला तर ती संरक्षणाचाही मार्ग दाखवील.”


गोरक्ष म्हणाला,, “कामधेनूनें आजपर्यंत आमचं रक्षण केलं. आतां तिचं रक्षण आम्हीं केलं पाहिजे. तिचं रक्षण करणारांचं ती रक्षण करील.”

“'मात्र तिची इच्छा असेल तर!” वसिष्ठ म्हणाले.

अनुशासन म्हणाला, “तिची इच्छा कशी समजणार?”

“तिची इच्छा आम्हां भक्तांना अंतःस्फूर्तीनें कळते.” मृगपाद तोऱ्यानें पुढें म्हणाला,' “देवतेच्या इच्छेचा कौल तिच्या भक्तांच्या अंतःकरणांत स्पष्टपणें घुमतो, समजलास? ह्या आंतरध्वनीशीं आपण एकनिष्ठ राहूं या. छात्रबंधूंनो! कुलपतींनीं स्पष्ट निर्णय दिला आहे. आपला मार्ग स्पष्ट झाला आहे. पुढील प्रसंगाला आपण सज्ज असलं पाहिजे.”

“कसाही प्रसंगाला तोंड देण्याला आम्ही सिद्ध आहोंत.” छात्रांनीं एकमुखानें गर्जना केली.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ६६८९ नों दि ....
वि. वा. ....

आश्रमांत हा प्रकार चालू असतां तिकडे सम्राटाच्या शिबिरांत निराळाच प्रकार चालू होता. सम्राट् राजपरिवारासह कामधेनु-हरणाचा घोर निश्चय करून शिबिरांत आला. प्रमुख मंत्री विदग्धराज व सेनापति ह्यांचीं खलबतें सुरू झालीं. कामधेनूचें हरण करतांना आश्रमाची लूट करून आश्रमाजवळ असलेला अन्नवस्त्रसंग्रहही लुटावा हें कारस्थान ठरलें. त्याप्रमाणें चक्रें सुरू झालीं.

सैनिकांना ही वस्तुस्थिति माहीत नव्हती. ते आश्रमानें दिलेल्या प्रसादभोजनाचे गोडवे गाण्यांत आणि भोजनानें आलेल्या सुस्तींत गुंग होते. एकाएकीं सैन्यानें शस्त्रास्त्रें घेऊन युद्धाला सिद्ध व्हावें अशी दवंडी शिबिरांत देण्यांत आली. ती ऐकून ते बुचकळ्यांत पडले. पुष्कळांना तें खरेंच वाटेना. पुन्हा पुन्हा ही घोषणा होत होती. तेव्हां सैनिक भानावर आले व टोळ्यांटोळ्यांनीं जमून आपसांत चर्चा करूं लागले.

एका प्रशस्तशा तंबूजवळ बरेचसे सैनिक जमून काय बोलत आहेत तें ऐका.

एक सैनिक म्हणतो, "अरे, हा दवंडीवाला कांहीं मादक द्रव्य खाऊन नशेंत तर नाहीं ना घोषणा करीत ?"

दुसरा म्हणतो, "मला तसंच वाटतं. त्या आश्रमांत मिळालेल्या मस्त भोजनाची गुंगी त्याला आली असावी. सुग्रास भोजनाचा हाताचा वास सुद्धा अद्याप गेला नाहीं, तों हें काय?"

तिसरा सैनिक म्हणाला, "माझ्या हाताचा लोण्याचा ओशटपणाही अद्याप गेला नाहीं. मी कसं शस्त्र धरणार हातांत?"

"अरे, पण शस्त्र हातांत धरून लढायचं कुणाशीं नि कशासाठीं?"

"लढायचं पोटासाठीं, म्हणायचं मोक्षासाठीं, समजायचं राजासाठीं."

"पुरे पुरे! पोटासाठीं लढणारे वीर आहांत खरे. पण कुणाशीं लढायचं? ज्या छात्रांनीं प्रेमानें जेवायला घातलं त्यांच्याशीं?"

"नव्हे रे मर्दा, राजा ज्याच्याशीं लढा म्हणून सांगेल त्याच्याशीं लढायचं. मग तो कोणी असो. सम्राटाच्या दावणींत बांधलेलीं ...."

"अरे, पण लढाईचे डोहाळे कां होत आहेत तुम्हांला? तो राजदूत काय आज्ञा घेऊन आला आहे ती पाहूं तर ...."

राजदूत सेनापतीची आज्ञा घेऊन शिबिरानजीक आला. त्यानें तेथील 'विमुख' नांवाच्या शताधिकाऱ्याला खास सेनापतींची आज्ञा कळविली कीं, "आतांच्या आतां आश्रमांत जाऊन, कामधेनूला दाव्यांनीं बांधून छावणीकडे घेऊन यावं. ह्या आज्ञेचं पालन त्वरित व्हावं. कुणीं विरोध केला तर त्याचा कसाही प्रतिकार करून कामधेनूचं हरण झालंच पाहिजे."

राजदूतानें सांगितलेला हा निरोप ऐकून सारे सैनिक खो खो हसूं लागले.

एक सैनिक हसत हसत म्हणाला, "आज छावणींत डोकं फिरलेल्या लोकांची सांथच आली आहे. अरे वेड्या, गायीला हांकलून आणायला १०० सैनिक कशाला?"

एका सैनिकानें दुसरीच क्लृप्ति काढून म्हटलें, "अरे! तो राजदूत जेवणाच्या सुस्तींत विसरलेला दिसतोय् राजाज्ञा कुणाला सांगायची तें. हे राजदूता, ही आज्ञा पशुशाळेंत काम करणाऱ्या एखाद्या घोडे नि तट्टं

चारणाऱ्या गोवाऱ्याला दिली असेल. गाय हाकलून आणायला रे १०० सैनिक कशाला ?"

एक तरुण सैनिक म्हणाला, "गाय हाकून आणायचं काम जर सैनिकांना सांगितलं असेल, तर तो सैनिकांच्या पराक्रमाचा अपमान आहे. असल्या आज्ञा देणाऱ्याचं डोकं ठिकाणावर नसावं. असले क्षात्रवृत्तीचा अपमान करणारे हुकूम आम्हीं कांहीं मानावेत ?"

"कोण म्हणतो हुकूम कां मानावेत म्हणून ?" सेनापति बलसिंह कडाडून बोलला. सारे सैनिक चूपचाप बसले. "राजाज्ञा न मानणाऱ्या नि तिची चेष्टा करणाऱ्या सैनिकांच्या पाठी घोड्यांच्या चाबकानें सडकून निघतील. शताधिकारी, त्वरित आश्रमांत जाऊन कामधेनूला दाव्यांनीं बांधून—नीट आली नाहीं तर काठीनें झोडपीत शिबिरांत घेऊन या. हें काम अर्ध घटकेच्या आंत झालं नाहीं, तर तुमचीं सर्वांचीं डोकीं अर्धचंद्र बाणांनीं उडविलीं जातील.

'विमुख' नांवाचा शताधिकारी होता. त्याला ह्या कामीं नियुक्त केलें होतें. तो शंभर सैनिक घेऊन पलायनाच्या चालीनें आश्रमांत कामधेनु-कुटिराकडे निघाला.

१०० सशस्त्र सैनिक येत आहेत ही वार्ता आश्रमांत पसरतांच शेकडों छात्र कामधेनु-कुटिराकडे जमा झाले.

विमुख त्या छात्रांना उद्देशून म्हणाला, "छात्रहो ! मी राजाज्ञेनें कामधेनूला राजशिबिराकडे नेण्यासाठीं आलों आहें. माझ्या कामांत जर तुम्हीं अडथळा आणाल तर तो राजाज्ञेचा अपमान समजून तुम्हांला देहदंड सोसावा लागेल. चला, हटा. कामधेनूला माझ्या स्वाधीन करा."

"कामधेनु तुम्हांला नेतां येणार नाहीं." गोरक्ष स्पष्टपणें म्हणाला.

"ठीक. मी तिला दाव्यानें बांधून घेऊन जातों. सैनिक हो ! शिरा कुटिरांत आणि कामधेनूला बाहेर काढा." आज्ञेप्रमाणें सैनिक कुटिरांत शिरूं लागले. छात्र त्यांना अडवूं लागले. हातपेटीस प्रकरण आलें.

सैनिकांनीं कमरेच्या समशेरी सरसावल्या. छात्रांनीं त्यांना गराडा दिला. अत्यंत चपलतेनें सैनिकांचे हात पकडून त्यांच्या तलवारी हिरावून घेण्यांत आल्या. छात्रांनीं ह्या प्रसंगीं इतकी चपळाई केली कीं छात्र काय करीत आहेत हें कळण्याच्या आंतच ते सारे सैनिक निःशस्त्र झाले. तरीही ते धिंगामस्ती करून कुटिरांत घुसूं लागले. तेव्हां छात्रांनीं त्या निःशस्त्र सैनिकांना पकडून रानवेलीच्या मजबूत काढण्यांनीं त्यांचे हातपाय जखडून बांधले. शंभर सैनिकांच्या त्यांनीं अशा प्रकारें गठड्या आवळल्या. ह्या अपमानानें चिडलेला विमुख सैन्याची आणखी मदत मिळविण्यासाठीं शिबिराकडे पळत निघाला. तो पळत असतां कोणा छात्रानें 'चरणबंध' नांवाचा बाण मारून त्याचे पळणारे पाय जखडून टाकले. त्यासरशीं तो धाडकन् जमिनीवर पडला. कांहीं छात्रांनीं त्याचीही गठडी आवळली. हा प्रकार चालू होतांच कामधेनु-कुटिराकडे गुरु व कुलपति येऊन पोचले. कुलपतींनीं हा प्रकार पाहिला. कुलपतींना पाहातांच कामधेनु-कुटिराच्या बाहेर येऊन वसिष्ठांच्या सन्निध आली. आपली पुष्ट मान वर करून भिंगासारख्या काळ्याभोर व स्निग्ध नेत्रांनीं ती वसिष्ठांकडे पाहूं लागली. वसिष्ठांनीं हात पुढें करतांच तिनें आपली मान त्यांच्या हातांत दिली. करुण नेत्रांनीं ती त्यांच्या मुद्रेकडे पाहात होती. वसिष्ठांचे नेत्रही स्निग्धगंभीर झाले होते. आत्मिक बलानें साऱ्या विश्वावर प्रेमसुधेचा वर्षाव करणारे वसिष्ठ व साऱ्या मानवी जगावर दुग्धामृताचा वर्षाव करून त्याला पुष्ट करणारी ती कामधेनु. आत्मबल व शरीरबल ह्या दोन देवतांचें तें करुणगंभीर मीलन होतें. ती रडवी करुणता नव्हती. साऱ्या विश्वाच्या सुप्त शक्तींना आवाहन करणारें दीप्तिमान कारुण्य होतें. महाकवींनीं वर्णिलेल्या रसराज कारुण्याचा तो आविष्कार होता. त्यांत मांगल्य होतें. दुष्ट शक्तींना सुष्ट करण्याचें सामर्थ्य होतें. कारुण्याला वाचा फुटून त्यानें विश्वांतील मंगलशक्तींचें आवाहन चालविलें होतें. तो प्रसंग अनिमिष नेत्रांनीं सगळे छात्र व गुरु पाहात होते. त्यांचे नेत्र ती

करुणासुधा प्राशीत होते. त्या प्रसंगाशीं सारेजण एकरूप झाले. शांति ! सर्वत्र शांति पसरली होती.

वसिष्ठ आपल्या भावनांच्या आवेगाचें संयमन करून स्निग्धगंभीर स्वरानें म्हणाले, "माते, तूं कां करुण वाणीनें पाहातेस ? तूं स्वतंत्र आहेस. तुला जर आश्रमाच्या सेवेचा, माझ्या संगतीचा कंटाळा आला असेल तर तूं सम्राटाकडे जाण्यास मोकळी आहेस. जर तुझी जाण्याची इच्छा नसेल तर तूं इतकी सामर्थ्यशाली आहेस, कीं तुझं कोणीच बलात्कारानें हरण करूं शकणार नाहीं." हें बोलणें ऐकून कामधेनूनें वसिष्ठाच्या पुढें गुडघे टेकून आपली मान त्यांच्या चरणांवर टाकली आणि एक कारुण्यपूर्ण हंबरडा फोडला. त्या 'हंब'रवाचा प्रतिनिनाद साऱ्या आसमंतांत दुमदुमला. आकाशांत कोंदला. छात्रांच्या हृदयकुहरांत घुमला. पर्वतापर्वतावर स्फुरला. त्या निनादानें सारें वातावरण झाकळून निघालें. छात्रांच्या तोंडून सहजस्फूर्त उद्गार निघाले, "कामधेनूचं रक्षण, कामधेनूचं रक्षण, कामधेनूचं रक्षण." ह्या उद्गारांत गभस्तीचें प्रखरत्व होतें. पर्वताची निश्चलता होती. वायूचें सर्वगामित्व होतें.

* * *

विमुख कामधेनूच्या हरणासाठीं गेला तो परत कां आला नाहीं हें पाहाण्यासाठीं राजदूत आला. त्यानें वार्ता नेली, कीं शतसैनिक व विमुख बद्ध होऊन आश्रांत पडले आहेत. हें वृत्त ऐकून सेनापति खवळले व ही अपशकुनी बातमी आणल्याबद्दल त्याच्या पाठीवर कोरडे ओढून त्याला हाकून लाविलें. आश्रमांत निनादित झालेला कामधेनुरक्षणाचा उच्च घोष राजमंडळाच्या कानीं आला. कामधेनूचें हरण ही साधी गोष्ट नव्हे; बलाचा पूर्ण उपयोग केला पाहिजे हें प्रत्ययास आलें. लगेच युद्धाची सिद्धता करण्यांत आली. सेनापति ससैन्य आश्रमावर चालून आला.

छात्र सिद्ध होतेच. सेनापति चिडला होता. युद्धाला प्रारंभ होणार तोंच वसिष्ठ छात्रांस म्हणाले, "छात्रहो ! आश्रमांत आजपर्यंत अहिंसेचं व्रत



अनुक्रम २८१५
विभाग वा.गो.
क्रमांक ८८६

आचरिलं आहे, हें लक्षांत ठेवा. तुम्हीं शिकलेली धनुर्विद्या संरक्षणासाठीं आहे. कामधेनूचं रक्षण शत्रूच्या बलिदानानें करूं नका. तुमच्याच बलिदानानें करा. आत्मत्यागानें शत्रूचें हृदयपरिवर्तन होईल ही खात्री ह्याही प्रसंगीं ठेवा."

सेनापति बलसिंह गर्जून बोलला, "सैनिक हो ! आश्रमानें अहिंसेचं हें ढोंग उभारलं आहे. त्याला भुलूं नका. कशाही प्रकारें कामधेनूचं हरण झालंच पाहिजे. आश्रमानें आपल्याशीं वैर धरलं आहे. ते सारे आपले वैरी आहेत. वैऱ्यांचा पराभव करणं हें क्षात्रधर्माचं ब्रीद आहे. सैनिकांपैकीं कित्येकांचीं मुलं व मुली शत्रुपक्षांत आहेत. रणांगणावर नातीं ओळखायचीं नसतात. प्राणपणानें रणांत झुंजा. जो लढाईची ढिलाई करील त्याचं डोकं सर्वांसमक्ष मारलं जाईल. करा हल्ला सुरू."

"आश्रम आपला शत्रु कसा ? त्यांनीं प्रेमानें दिलेलं जेवण शत्रुत्वाचं दर्शक काय ? शिवाय ह्या निःशस्त्र मुलांवर शस्त्र उगारणं हें क्षात्रधर्माचं विडंबन आहे." एका तडफदार सैनिकानें त्वेषानें भाषण केलें. सेनापति स्वतः त्याच्यावर खवळून धावले. त्यांनीं समशेरीच्या एका घावानें त्याचें मस्तक धडापासून वेगळें केलें. रक्ताचा अभिषेक झाला भूमीला. सैनिक भ्याले. मनांतून रुष्ट झालेले सैनिक हल्ल्यास प्रवृत्त झाले. छात्र तयार होतेच. सैनिकांकडून शरवर्षाव होऊं लागला. चपळ छात्र त्यांचे बाण चुकवूं लागले. स्वतः सेनापति त्यांच्यावर रथांतून तिरंदाजी करीत होता. खेळांत विरुद्ध पक्षाच्या गड्याला चुकवावें, तितक्या खेळाडूपणानें छात्र ते बाण चुकवूं लागले. सैनिकांचे भाते रिकामे होत आले, तरी छात्रांना किरकोळ जखमा होण्यापलीकडे अधिक इजा झाली नाहीं. शरसंधान फारसें उपयोगी पडत नाहीं असें पाहातांच गदाधारी सैनिक छात्रांवर सोडण्यांत आले. गरगर गदा फिरवीत ते धावले. पहिल्या धडाक्यांत त्यांनीं अनेक छात्रांस जमिनीवर लोळविलें. लगेच वेत्रपाणी गुरुजींनीं आपले गदायुद्धप्रवीण शिष्य त्यांच्यावर सोडले. त्या नव्या तुकडीनें निकराचा

सामना करून त्यांच्या गदाच हरण केल्या. नंतर सेनापतीनें खड्गधारी तुकडी युद्धाला पाठविली. तिची छात्रांनीं फारच फजिती केली. तलवारीच्या घावांचें ढालीनें निवारण करून हातीं घेतलेल्या काढण्यांनीं असे पवित्रे केले, कीं सैनिकांच्या खड्गधारी हाताला नेमका फास पडून तो कैदी व्हावा. ती सारी तुकडीच्या तुकडी छात्रांनीं कैद केली. मग चक्रधारी सैनिक चालून आले. छात्रांच्या एका तुकडीनें त्यांच्यावर चाल केली. सैनिकांनीं सोडलेलीं चक्रें पूर्णवेगांत येण्यापूर्वींच एका विशिष्ट प्रकारच्या लोखंडी आकड्यांत अडकवून तीं हस्तगत करून घेतलीं. आश्रमीय मुली हीं पराभूत झालेलीं हत्यारें गोळा करून पळवून नेत. कोणत्याही प्रकारच्या शस्त्राचा इलाज आश्रमाच्या छात्रांपुढें चालेना. ह्या पराभवानें सैनिकांचा धीर सुटला.

ही युद्धवार्ता सम्राटाला कळतांच तो स्वतः आपलें खास पथक घेऊन रणाकडे धावला. सम्राटानें परिस्थिति पाहिली. आपल्या खास पथकाला हल्ल्याची खास आज्ञा दिली. ह्या खास पथकानें करालमुख बाणांचा वर्षाव सुरू केला. हे बाण फार वेगवान् असून ते चुकविणें अशक्य होतें. लगेच छात्रांची धनुर्धारी तुकडी युद्धाला सरसावली. ते शत्रूकडून येणारा प्रत्येक करालमुख बाण आपल्या अर्धचंद्र बाणानें मध्येंच तोडीत किंवा वरच्यावर उडवून हीनप्रभ करीत. शेंकडो बाणांची अशी वाट लागलेली पाहातांच विश्वामित्र फार चिडला. त्यानें गर्जून आज्ञा दिली, "सैनिक हो! ज्याला जें जें शस्त्र वापरतां येईल त्यानें त्यानें तें तें शस्त्र घेऊन सर्वांनीं छात्रांवर एकदम हल्ला करावा. सापडेल त्या छात्राची व गुरूची हत्या करावी. जो हें वीरकर्म करील त्याला फार मोठं पारितोषिक देण्यांत येईल."

आतां छात्रांना फार मोठी संरक्षक लढाई करावी लागली. साऱ्या मुलींनीं कामधेनूच्या भोवतीं कडेकोट बंदोबस्त केला. सर्व छात्र व गुरु धनुष्यबाण घेऊन सज्ज झाले. सैनिक चालून आले. छात्रांनीं अनेक कौशल्ययुक्त केलेल्या यांत्रिक बाणांनीं त्यांची गति कुंठित केली.

कित्येकांच्या तलवारी तोडल्या. कित्येकांचीं धनुष्यें तोडलीं. कित्येकांचे हात जखडले. सारे सैनिक निरुपयोगी झाले. सेनापति, युद्धमंत्रिसुद्धा ह्यांतून सुटले नाहींत. एकटा विश्वामित्र मात्र मोकळा राहिला. त्यानें सैन्याकडे नजर टाकली. केविलवाणीं तोंडें करून ते निःशस्त्र व कैदी बनलेले दिसले. सम्राट् विश्वामित्र हीनप्रभ झाला. तो एकटा बाणांचा पाऊस पाडीत होता. चपळ चिमण्या पांखरानें शिकाऱ्याचा नेम हटकून हुकवावा व त्याच्याच दृष्टीसमोर दुसऱ्या फांदीवर बसावें त्याप्रमाणें ते छात्र बाणांचा नेम हुकमी चुकवीत. विश्वामित्र थकला. बाणांचा भाता खलास झाला. सारथी, सेवक, दूत सारे सारे निःशस्त्र, धैर्यहीन झाले. सम्राटाची ही केविलवाणी अवस्था पाहून वसिष्ठ त्याच्या सामोरे जाऊन प्रेमळ स्वरानें म्हणाले, " वत्सा, विश्वामित्रा ! तूं आपल्या क्षात्रबलाचा भलत्या ठिकाणीं उपयोग करून पराभूत झालास. आतां...."

विश्वामित्र करड्या आवाजांत बोलला, " कुलगुरु मला खिजविण्यासाठीं हें बोलत आहेत. अजून माझं सैन्य मोकळं झालं तर मी आश्रमाचा पराभव करीन. "

वसिष्ठ म्हणाले, " ठीक आहे. मी साऱ्या सैनिकांना मोकळे करवितों. पण आधीं तूं त्या सैनिकांत लढाईचा उत्साह आहे का हें पाहिलंस का ? "

विश्वामित्र गर्जून म्हणाला, " सैनिक हो, तुम्हांला आश्रमानें कैदेंतून सोडवलं तर तुम्ही पुन्हा प्राणपणानें आश्रमाशीं लढून क्षात्रधर्माची विजयध्वजा फडकवाल का ? बोला ! "

सैनिकांकडून कांहींच उत्तर येईना.

" बोला. स्तब्ध कांय बसलांत ? कुठें गेला तुमचा पराक्रम ?" विश्वामित्र त्वेषानें बोलत होता, " सेनांपति, युद्धमंत्री, विदग्धराज, असे स्वस्थ कां ? माझं खाल्लेलं अन्न — खाल्लेल्या मिठाला जागा. "

विदग्धराज भीत भीत म्हणाला, " महाराज, बोलण्यासारखं काय उरलं आहे ? आश्रमाच्या प्रभावापुढें सैनिक दिपून गेले आहेत. "

सम्राट् चिडून बोलला, “ आश्रमाचा प्रभाव. ह्या अंगठ्याएवढ्या पोरांचा प्रभाव कसला आला आहे ! आश्रमाचा प्रभाव ! ”

“ आत्मतेजाचा ! ब्राह्मतेजाचा ! ! ” दशदिशांतून ध्वनि निघावा तसा घनगंभीर ध्वनि दुमदुमला.

“ तर मग क्षात्रतेजापेक्षां आत्मतेज – ब्राह्मतेज अधिक आहे ? ”

“ होय. अभिमानाचा लेशही मनांत न धरतां मी सांगतों, ह्या कामधेनुविद्यालयांतील छात्रांना जें अभिनव असं आध्यात्मिक जीवनाचं शिक्षण दिलेलं आहे त्या शिक्षणानें सामर्थ्यसंपन्न झालेले छात्र जगांतल्या कोणत्याही हिंसक प्रवृत्तीपुढें पराभूत होणार नाहींत. त्यांचं आत्मतेज सगळ्या हिंसक सामर्थ्याचा नायनाट करवील ! ” वसिष्ठ बोलले.

“ कुलपति, ठीक आहे. मी क्षात्रबलाचा आजच्यापुरता पराभव कबूल करतों. पण क्षत्रियाला आत्मबल मिळवणं ही गोष्ट अशक्य नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं मी साम्राज्याचा त्याग करून आत्मबलाचं साधन करण्यासाठीं वनांत जातों ! आत्मबलांतसुद्धा वसिष्ठापेक्षां विश्वामित्र कमी नाहीं हें प्रत्ययास आणून देईन हीच प्रतिज्ञा. ” इतकें बोलून विश्वामित्र निघून गेला.

वसिष्ठ म्हणाले, “ परमात्मा तुला बल व शांति देवो ! ”

ॐ शांतिः शांतिः शांतिः !

अनुक्रम २४४७५
क्रमांक ८८६
नों. दि. ८-२-५९
वाचनालय शाखा
६८८१



IRBK-0106991
IRBK-0106991

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क. ...
वि. ... नों दि. ...


# महाराष्ट्राचे संजीवक

लेखक — दा. न. शिखरे, एम्. ए.

१ लोकमान्य टिळक
२ न्यायमूर्ति रानडे
३ सार्वजनिक काका
४ मालाकार चिपळूणकर
५ ‘ सुधारक ’ कर्ते आगरकर
६ साहित्यसम्राट् केळकर
७ महान् मुत्सद्दी ना. गोखले
८ काकासाहेब खाडिलकर
९ ‘ काळ ’ कर्ते परांजपे
१० स्वातंत्र्यवीर सावरकर
११ सेनापति बापट
१२ सन्त साने गुरुजी

मूल्य प्रत्येकीं आठ आणे

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

छत्रपति शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्रालों जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. तें सिंहासन परत मिळविण्यासाठीं असंख्य नररत्नें झटलीं व झगडलीं हें आपलें केवढें भाग्य !

आतां आपल्याला नवा भारत, नवा महाराष्ट्र उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेवलीं पाहिजेत. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नव्या पिढीच्या नसांतून खेळेल तरच आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण करावयाचें म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें नव्या पिढीला सांगणें. महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या बारा विभूतींचीं चरित्रें श्री. शिखरे ह्यांनीं मुद्दाम लिहिलीं आहेत. श्री. शिखरे ह्यांनीं तीं कशीं लिहिलीं असतील हें लिहिणें नलगे.

केशव भिकाजी ढवळे, मुंबई २